महापालिकेच्यावतीने साकारलेल्या सरसंघचालक बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरीचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते केले. यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपमहापौर सरस्वती शेंडगे, आयुक्त शेखर गायकवाड, अतिरिक्त आयुक्त रुबल अग्रवाल, खासदार वंदना चव्हाण, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विरोधी पक्षनेत्या दिपाली धुमाळ, सभागृहनेते धीरज घाटे, स्थानिक नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, माजी नगरसेवक बाळासाहेब बोडके उपस्थित होते.

पाटील म्हणाले, प्रत्येक जिल्ह्याला एक छोटे का होईना विमानतळ असले पाहिजे. सर्व निकष पूर्ण करणारे एक हेलिपॅड प्रत्येक तालुक्यात असावे. अत्यावश्यक वेळेत हे गरजेचे आहे. पवार या मागण्या पूर्ण करतील कारण ते स्वत: डायनॅमिक लीडर असून त्यांना मुख्यमंत्र्यांशी बोलायची गरज नाही, कारण तुम्हीच आमच्यासाठी मुख्यमंत्री आहात अशी कोपरखळी मारली.



सरसंघचालक बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महापौर मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

### 'महानगरपालिकेच्या निवडणुकीत कुठे गेला होता?'

- अजित पवार जेव्हा व्यासपीठावर भाषण करायला आले तेव्हा त्यांच्या नावाचा मोठ्याने घोषणाबाजी सुरु झाली. त्यावेळी त्यांनी घोषणा देणाऱ्यांना थांबवित 'महापालिका निवडणुकीत कुठे गेला होता' असा मिश्किल सवाल करताच सर्वत्र हशा पिकला.

### महापौर म्हणाले 'तेव्हापासून' दादा आपलेसे वाटतात

- चंद्रकांत दादा आणि अजित दादा आपलेच आहेत. परंतु, २३ नोव्हेंबरच्या पहाटेपासून अजितदादा अधिक आपलेसे वाटू लागल्याची मिश्किल कोटी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी केली. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटे घेतलेल्या शपथविधीची महापौरांच्या वक्तव्याला पार्श्वभूमी होती. या कोटीवरही कार्यक्रमात हास्याची लकेर उमटली.

Hello Pune
Page No. 3 Mar 11, 2020
Powered by: erelego.com

# MEDIA COVERAGE OF INAUGURATION OF AVIATION GALLERY

नव राष्ट्र

## शहराच्या विकासात राजकारण आणणार नाही

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पुणेकरांना शब्द

**पुणे** : महापालिकेत जरी भाजप सत्तेवर असला तरी, मी मंत्री मंडळात असेपर्यंत पुण्याच्या विकासात राजकारण करणार नाही असा शब्द उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणेकरांना दिला. महानगरपालिकेने शिवाजीनगर - गावठाण येथे उभारलेल्या 'सरसंघचालक बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरी'चे उदघाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी ते बोलत होते.



■ यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, भाजपा प्रदेशाध्यक्ष व आमदार चंद्रकांत पाटील, उपमहापौर सरस्वती शेंडगे, आयुक्त शेखर गायकवाड, अतिरिक्त आयुक्त रूबल अग्रवाल, खासदार वंदना चव्हाण, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विरोधी पक्षनेत्या दिपाली धुमाळ, सभागृहनेते धीरज घाटे, गॅलरी पुर्णत्वास आणणाऱ्या नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष आणि गॅलरीची संकल्पना मांडणारे बाळासाहेब बोडके, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे आदी उपस्थित होते.

महापौर मोहोळ यांनी केलेल्या मागण्यांचा संदर्भ घेत पवार म्हणाले, महापालिकेचे वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक ती परवानगी तातडीने दिली जाईल. हा विषय अंदाजपत्रकापुर्वी माझ्याकडे आला असता तर अंदाजपत्रकातच वैद्यकीय महाविद्यालयाची घोषणा केली असती. त्याचप्रमाणे नदी सुधार योजनेसाठी आवश्यक ती परवानगी त्वरीत देऊ. परंतु या सर्व कामांच्या निविदा पारदर्शी झाल्या पाहीजेत. चुकीच्या गोष्टींना साथ दिली जाणार नाही, पुणेकरांच्या हितासाठी, विकासासाठी मी मंत्रीमंडळात आहे तोपर्यंत काम करेन.

■ पुण्याला न्याय देण्याचा माझा प्रयत्न असेल. यात महापालिकेत जरी भाजप सत्तेत असला तरी विकासात राजकारण आणणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अशा एव्हिएशन गॅलरी प्रत्येक जिल्ह्यात व्हायला हव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. येत्या काळात प्रत्येक जिल्ह्यात मेडिकल कॉलेज उभारण्याचा मानसही त्यांनी यावेळी बोलून दाखवला. पुण्यासाठी अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदींची माहीती पवार यांनी दिली.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी विविध विकास कामांवर भाष्य करताना अजित पवारांकडे विमानतळ आणि हेलिपॅडची मागणी केली. पाटील म्हणाले, प्रत्येक जिल्ह्याला एक छोटे का होईना विमानतळ असले पाहिजे तसेच सगळे नियम पूर्ण करणारे एक हेलिपॅड प्रत्येक तालुक्यात असावे. आत्पकालीन परीस्थीत या विमानतळ, हेलीपॅडचा मदतकार्यासाठी उपयोग होऊ शकतो.

Navarashtra Pune Edition
11 Mar, 2020 Page No. 7

## पुण्याच्या विकासात राजकारण नाही

### अजित पवार यांची स्पष्ट ग्वाही

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुण्याच्या विकासात कोणत्याही स्वरूपाचे राजकारण करणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही देतानाच पुण्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालय व्हावे, यासाठी पालिकेच्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल,' असे ठाम आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. राज्यासह वेळप्रसंगी केंद्र सरकारच्या मदतीने पुण्याचे प्रश्न सोडविण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे महापालिकेच्या सरसंघचालक बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, महापौर मुरलीधर मोहोळ, खासदार वंदना चव्हाण, आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची मागणी महापौर मोहोळ यांनी केली होती. तोच धागा पकडून उपमुख्यमंत्री पवार यांनी प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालयाची गरज असून महापालिकेचे महाविद्यालय आता होण्यातच जमा आहे, असेही त्यांनी नमूद केले. पुण्यात नवीन विमानतळाची गरज असल्याचे सांगतानाच सध्या त्यासाठी कमी निधी असला, तरी तो मुख्यमंत्र्यांना सांगून वाढवून घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये मेट्रो व्हावी, यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचा दावा त्यांनी केला.

महानगरपालिकांनी नागरी सुविधा देण्याबरोबरच ट्रॅफिक पार्कसारख्या नवनवीन गोष्टींचे ज्ञान देणाऱ्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, अशी अपेक्षा चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात विमानतळ आणि प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी हेलिपॅड तयार होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या २०१७च्या निवडणुकीनंतर एव्हिएशन गॅलरीचे काम पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी ज्योत्स्ना एकबोटे यांनी सातत्याने प्रयत्न केले. तर, याच भागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक बाळासाहेब बोडके यांच्या काळात ही संकल्पना मांडण्यात आली होती.



पुणे पालिकेच्या बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांच्यासह महापौर मुरलीधर मोहोळ आणि नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांनी गॅलरीची पाहणी केली.

**Maharashtra Times 11-3-2020**

# Work of Appreciation

प्रा. सौ. ज्योत्स्ना गजानन एकबोटे अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, कार्यक्षम नगरसेविका, पुणे मनपा यांच्या संकल्पनेतून व शुभहस्ते फर्गुसन रोड वरील विद्यार्थी सहाय्यक समिती वसतिगृह नामफलक अनावरण दिनांक १४.३.२०२० रोजी समारंभ पूर्वक करण्यात आले. त्यावेळी वसतिगृहाचे पदाधिकारी, विद्यार्थीनी उपस्थित होते. शहरात नव्याने येणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनी, पालक व नातेवाईक यांना वसतिगृह शोधणे सोपे होणार आहे. प्रा. सौ. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांचे अभिनंदन व स्तुत्य उपक्रमाबद्दल मनःपूर्वक आभार. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा....!






# International Women's Day

On the occasion of International Women's Day Prof. Manisha Mandhare, Department of Botany was felicitated by Dr. Shakuntala Kale for her contribution in education and social activities on 9th March 2020. The programme was organized by Amhi Punekar along with Jijamata Puraskar Samiti, Maharashtra Rajya.














# International Women's Day

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे आणि रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सावित्रीबाई सन्मान पुरस्कार सोहळा दिनांक ८.३.२०२० रोजी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोडबील** या विषयावर डॉ. निशा भंडारे यांचे व्याख्यान झाले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मालिकेत रमाईचे पात्र साकारणारी अभिनेत्री शिवानी रांगोळे उपस्थित होत्या.





केसरी

बुधवार ११ मार्च २०२०, पुणे

## रमाईचा त्याग खूप काही शिकवतो

### अभिनेत्री शिवानी रागोळे हिचे प्रतिपादन

**पुणे** : महान व्यक्तींच्या जडणघडणीत मातांचे, पत्नीचे योगदान महत्वाचे असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मालिकेत रमाईची भूमिका करताना खूप काही गोष्टी शिकले. त्यांच्याकडून मला नेह्मी प्रोत्साहन मिळते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मालिकेत रमाईचे पात्र साकारणारी अभिनेत्री शिवानी राग-ळे हिने केले. रमाईचा त्याग आपल्या सगळ्यांना खूप शिकवतो, असेही तिने नमूद केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे आणि रोटरी क्लब ऑफ पुना डाऊन टाऊन यांच्या वतीने जागतिक महिला दिवसानिमित्त 'सावित्रीमाई सन्मान' पुरस्कार सोहळ्यात शिवानी रागोळे बोलत होती. बोपोडी येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात आयोजित या सोहळ्यात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोडबील' या विषयावर डॉ. निशा भंडारे यांचे व्याख्यान झाले. प्रसंगी अंतराळ अभ्यासिका लिना बोकील, दिनाझ तारापोरे, नगरसेविका सुनीता वाडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव समिती अध्यक्ष परशुराम वाडेकर, सरचिटणीस दीपक म्हस्के, अनिता ढोरे, कल्याणी मांडके, जॉलीदादा मोरे, लक्ष्मी शेवाळे आदी उपस्थित होते. रत्नमाला निकाळजे, श्रद्धा तांबे, शकुंतला बराटे, भीमाबाई जाधव, लता गायकवाड, नाझीम ढाले, ऍड शारदा वाडेकर, सीमा पाटील, प्रज्ञा वाघमारे यांना विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य केल्याबद्दल 'सावित्रीमाई सन्मान' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच महिलांचा सन्मान करण्यासाठी उपस्थित हजारो महिलांमधून लकी ड्रा काढण्यात आले आणि सोळा महिलांना पैठणी भेट देण्यात आली. अनिता ढोरे यांनी शंख वादन केले. सूत्रसंचालन दीपक म्हस्के यांनी केले. आभार सुनीता वाडेकर यांनी मानले.

# Corona Virus Protection Measures








# Department of animation

Miss. Gayatri Deshmukh, TYBSc , Department of Animation created Video on ***How to Stay Safe during COVID-19 Pandemic.*** The video is available on YouTube and can be accessed on https://youtu.be/6TaN04-Ez0s . The short video beautifully created by Gayatri Deshmukh under the able guidance of the teachers of Department of Animation shows the importance of staying indoors during COVID-19 pandemic and how to prevent from spreading infection when the lockdown was declared from 24th March 2020. Some screenshots of the video are as follows:











# MODERN SELFIE POINT

**Slogan for 14.3.2020 to 20.3.2020**

*"We, at Modern College, are committed to Reduce, Reuse and Recycle Water and Paper"*

(L to R) Librarian Dr.S.S.Sengupta, Mrs. Sarika Sable, Shri. Anil Kakad, Shri. Sambhaji Shendkar.






# *MODERN ACHIEVEMENTS*

## Department of Geography

Prof. Barnali Das, Department of Geography attended training program for ***'Young Geomorphologist'*** organized by International Association of Young Geomorphologist to celebrate Geomorphology week which was conducted during 2 to 5th March 2020.









Kolkata
YGF-INDIA
2020

IGI – Young Geomorphologists Forum

Intensive Training Programme for
THE YOUNG GEOMORPHOLOGISTS OF INDIA
2-5 March, 2020 at Department of Geography, University of Calcutta

Certificate of Participation

This is to certify that Ms. Barnali Das of Modern College, Pune has attended the 1st Intensive Training Programme for the Young Geomorphologists of India as a participant.

| Shreya Bandyopadhyay | Sayantan Das | Kapil Ghosh | Arindam Sarkar | A. R. Siddiqui |
|---|---|---|---|---|
| Convener | Co-convener | Organising Secretary | Jt. Organising Secretary | Secretary General, IGI |

# MODERN ACHIEVEMENTS

***'यंग इंडिया के बोल'*** या भारतीय युवक काँग्रेसद्वारा घेतल्या गेलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये मॉडर्न कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे,५ येथील विद्यार्थिनी **निकिता शंकर बहिरट (प्रथम वर्ष विज्ञान)** हिने भारतामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. निकिता खूप खूप अभिनंदन आणि पुढील यशस्वी वाटचालीस लक्ष लक्ष शुभेच्छा







Image Courtesy: Google Images

# MODERN ACHIEVEMENTS

In the wake of the COVID -19 pandemic in Mid - March 2020, Savitribai Phule Pune University, Pune has developed E-content Portal (http://studymaterial.unipune.ac.in:8080/jspui/) and for managing the study material on the portal, 30 Librarians were selected from various colleges under the jurisdiction of SPPU, Pune.

**Dr. Shantashree Sengupta**, Librarian, Modern College of Arts, Commerce and Science (Autonomous), Shivajinagar, Pune-5 is one of the Librarian who got selected for the work of uploading study materials in the SPPU E-content Portal. The following subject are allotted to Dr. S. Sengupta-

1) Modelling and simulation
2) Media and communication
3) BSc Blended
4) B.Voc (All Courses)

⇒ B.Voc (Beauty Therapy and Aesthetics)
⇒ B.Voc (Banking and Finance)
⇒ B.Voc (Dairy Technology)
⇒ B.Voc (Fashion Technology)
⇒ B.Voc (Food Processing)
⇒ B.Voc (Retail Management)
⇒ B.Voc (Software Development)
⇒ B.Voc (Travel and Tourism)

5) BSc Animation

The study materials uploaded on the SPPU E-content Portal is available full-text, freely downloadable.




Image courtesy: https://clipart.info/congratulation-images-free-with-flower-in-hd-9942

# UDEMY COURSE

On 26th March 2020, Respected Principal Dr. R.S.Zunjarrao motivated all the Head of the Departments to register for ***Online Course on MS-Powerpoint*** on **Udemy Platform** (a global platform offering free online training programs during COVID-19 breakthrough).

Dr. Anjali Sardesai, IQAC Co-ordinator and Head, Department of Animation took continuous follow-up of the registration process of the Head of the Departments.

Feedback shared on WhatsApp by some of the participants on completing the course is as follows:



Respected all, attending Udemy's Microsoft PowerPoint training tutorial from 26th March - 29th March 2020 has indeed been an enriching learning experience. The training module is very well designed with 19 sections, discussing in depth every aspect of ppt. right from introduction to its advanced stage, making this course quite comprehensive. This training gave me an insight on how to create simple yet elegant presentations using all the features, which most of us ignore while preparing our ppt' s. Though not a new user to ppt making, but definitely this tutorial has helped and going onwards will help in empowering us with the knowledge and skills important to be a proficient ppt maker. The pdf manuals in the end of the tutorial are an added advantage for quick and easy reference.
I extend my sincere gratitude to respected principal sir & Dr. Sardesai madam for giving us the opportunity to learn during the quarantined times full of media rich learning experience. I have completed the 71 modules of the course 🙏 11:26

Feedback shared by Prof Lawly Das



Philomena BBA Modern College Shiv...

68 KB

Good evening everyone. Successfully completed online FDP.Hearty thanks to all for giving me an opportunity to learn new things.Special thanks to Dr Principal sir and Dr Anjali Sardesai mam 19:50






The FDP had 18 Sections and 69 video lectures, 2 E-book Manuals on Introductory and Advanced PowerPoint. It was an excellent idea of Respected Principal Sir to announce this program and motivate all of us to join in it. Thanks to Dr.Anjali Sardesai Madam who planned the Program .
The Udemy course was a nice experience. We all use PPTs but might have thought initially when the Program PDD was posted that 'What to learn in and about PPT?'.
But really there is a lot to learn in PPT. These video lectures will prove to be very helpful for all of us with the various functions, shortcuts, never before used options to enhance our PPTs.
The 02 E-books are great to be downloaded and kept for ready reference.
The language, accent, the method of explanation was very simple.
Concepts covered in Section-14 and 16 were new to me.
I am thankful once again to Respected Principal Sir for giving us this good opportunity to learn new things in this lockdown period.
One thing I would like to mention is, I completed the course by downloading the **Udemy** App from Google Play Store. Just login using your FDP enrollment credentials and start learning.
Waiting to learn more...🙏😊
From- Dr.Shantashree Sengupta, Librarian. 13:28

# News Paper Clippings During March 2020



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf*]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. From July 2019- September 2019 Issue of *MODLIB Bulletin* has introduced E-newspaper Clippings Service through which it will have a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

# ‘आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट’चे प्रकल्प ‘यूट्यूब’ चॅनेलवर

### विद्यार्थ्यांसाठी ‘सायन्स फॉर कॉमन’ची सुरुवात

Chaitrali.chandorkar
@timesgroup.com
Tweet : @chaitralicMT

पुणे : विज्ञानातील नवनवे संशोधन अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, या उद्देशाने ‘आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट’ने पुढचे पाऊल उचलले आहे. इन्स्टिट्यूटने त्यांचे संशोधन प्रकल्प आणि त्यातील घडामोडी शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘सायन्स फॉर कॉमन’ हे नवे यूट्यूब चॅनेल सुरू केले आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने इन्स्टिट्यूटने विविध विषयांवर आधारित ७५ व्हिडिओ या चॅनेलवर प्रसिद्ध केले आहेत.



आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट.

### ‘विद्यार्थ्यांना संवाद साधता येणार’




व्हिडिओ चॅनेलवर जीवाश्म, औषधी वनस्पती, कृषी विषयक, पीक नियोजन, डायटम्स, हायड्रा, ड्रोसिफिला, बायोएनर्जी, बायोप्रोस्पेक्टिंग, क्लिफ व्हेजिटेशन आणि पठारांवरील वनस्पती आदी विविध विषयांवर माहिती देणारे ७५ हून अधिक व्हिडिओ प्रसिद्ध केले आहेत. त्यामध्ये स्वतः संशोधकांनी प्रत्येक विषयातील बारकावे स्पष्ट केले आहेत. साधारणतः ९वी आणि १०वीतील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी संवाद साधला आहे. व्हिडिओ बघताना विद्यार्थ्यांना काही शंका आली तर त्यांना थेट विचारणेही शक्य आहे. त्यामुळे संस्थेतील संशोधक, विद्यार्थी आणि इतर अभ्यासकांमधील संवाद वाढण्यास मदत होईल, अशी माहिती डॉ. मंदार दातार यांनी दिली.

केंद्रीय वैज्ञानिक संशोधन संस्थांमध्ये नेमके कसे काम चालते, तेथील संशोधक कशा पद्धतीने अभ्यास करतात, त्यांची संशोधन पद्धती याबद्दल शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांना कुतूहल असते. या संस्थांच्या ‘ओपन डे’ला विद्यार्थी मोठ्या संख्येने संस्थेचे कामकाज बघायला येतात. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी वाढता ओढा लक्षात घेऊन ‘आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट’ने आपण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, असा विचार केला आणि त्यातून यूट्यूब चॅनेलचा पर्याय पुढे आला. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. प्रशांत ढाकेफळकर यांच्या पुढाकारातून डॉ. गुरुदत्त वाघ, धनंजय बोडस, संतोष जायभाय, मंदार दातार आणि कार्तिक बालसुब्रह्मण्यम यांनी दोन महिन्यांपूर्वी पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्याकडूनही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

‘विद्यार्थी आणि अभ्यासकांकडे नवनवीन कल्पना आहेत; पण त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. त्यांना नवीन प्रयोग राबविण्यासाठी संशोधकांनी केलेल्या संशोधनाचे संदर्भ हवे असतात. प्रत्येकाला पुण्यात येणे शक्य होतेच असे नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्यापर्यंत संस्थेतील संशोधन अहवाल चॅनेलच्या माध्यमातून पोहोचविणार आहोत. आमचे पीएचडीचे विद्यार्थी उत्साही आहेत. त्यांनी त्यांच्या प्रकल्पांची माहिती सहजसोप्या भाषेत, काहींनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणारे छोटे व्हिडिओ तयार केले आहेत. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही बसलेल्या अभ्यासकांना आता ही माहिती सहज उपलब्ध होणार आहेत,’ असे डॉ. गुरुदत्त वाघ यांनी सांगितले.

**Maharashtra Times 2-3-2020**

सकाळ

# पुनर्मूल्यांकन शुल्काबाबत विद्यापीठाचे धरसोडीचे धोरण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा खर्च वाढत असल्याने व्यवस्थापन परिषदेकडून पुनर्मूल्यांकन आणि उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतींच्या शुल्कात वाढ केली जाते; पण त्यानंतर पुन्हा शुल्क कमी केले जात असल्याचे आतापर्यंतच्या निर्णयावरून स्पष्ट झाले आहे. या धरसोडीच्या धोरणामुळे या शुल्कांबाबत विद्यापीठ कायम वादाच्या भोवऱ्यात आहे.

पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने २००२ मध्ये दर दोन वर्षांनी परीक्षा विभागातील शुल्कात १० टक्के वाढ करावी, असा निर्णय घेतला होता. त्याची काही वर्षे अंमलबजावणी झाली. त्याला झालेल्या विरोधामुळे त्याची अंमलबजावणी बंद केली. २००९ मध्ये तत्कालीन राज्यपालांनी विद्यापीठाने स्वतःचे उत्पन्नाचे स्रोत निर्माण केले पाहिजेत, त्यातून किमान २० टक्के निधी वाढला पाहिजे, अशा सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, विद्यापीठाचे शुल्क कमी असल्याचे समोर आल्यानंतर २०१३ मध्ये अचानक उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी तब्बल ५०० रुपयांचे शुल्क निश्चित केले, त्यावरूनही आंदोलन सुरू झाल्याने हे शुल्क विद्यापीठाने २०१४ मध्ये ४०० रुपये, २०१५ मध्ये २५० आणि २०१६ मध्ये १०० रुपये केले. गेली तीन वर्षे विद्यापीठाने या शुल्कात वाढ केली नव्हती.

विविध परीक्षा शुल्क व इतर शुल्कांतून सुमारे १५५ कोटींचे उत्पन्न मिळत आहे.

> **विद्यापीठाने यापूर्वी विद्यार्थी व संघटनांच्या मागणीमुळे शुल्कवाढ कमी केली होती; परंतु तंत्रज्ञान, मनुष्यबळ यासह सर्वच खर्च वाढले आहेत, त्यामुळे अपरिहार्यतेमुळे शुल्कवाढ करावी लागली आहे. तरीही विद्यापीठाने संपूर्ण भार विद्यार्थ्यांवर टाकलेला नाही, ही कमीत कमी केलेली वाढ आहे.**
> **– डॉ. एन. एस. उमराणी,**
> प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

Pune, Main
03/03/2020 Page No. 3

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

सकाळ

# विद्यार्थ्यांमुळेच शिक्षण संस्था नावारूपाला

## भोसे येथे कामगारमंत्री वळसे पाटील यांचे प्रतिपादन

**चाकण, ता. २ :** शिक्षण संस्थाचालक महत्त्वाचे नसून, महाराष्ट्र राज्यातील विविध स्तरांतील विद्यार्थी व पालक महत्त्वाचे आहेत. त्यांच्यामुळेच राज्यभरातील विविध शिक्षण संस्था नावारूपाला आल्या आहेत, असे प्रतिपादन कामगारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भोसे (ता. खेड) येथे केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सद्गुरू बापूसाहेब मिटकर मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचे उद्घाटन राज्य उत्पादन व कामगारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी मंत्री वळसे पाटील म्हणाले की, संस्थेचे संस्थापक कै. शंकरराव कानिटकर यांनी ही शिक्षण संस्था स्थापन केली. गेल्या अनेक वर्षांपासून या संस्थेचे नेतृत्व डॉ. गजानन एकबोटे करीत आहेत. या संस्थेचा विस्तार व प्रगती होत आहे. उद्योगपतींची मुले उद्योगपती, डॉक्टरांची मुले डॉक्टर, इंजिनिअरची मुले इंजिनिअर हे चित्र बदलले आहे. कारण, राज्य सरकार अनुसूचित जाती व जमाती वर्गातील विद्यार्थ्यांची शंभर टक्के फीचा भार उचलते. तर, ओबीसी घटकातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना पन्नास टक्के सवलत फीमध्ये मिळते. खुल्या गटातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न तीन लाख रुपये आहे. अशाही विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी पन्नास टक्के सरकार भरत असल्याने सर्व स्तरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या पदावर पोचत आहेत.

या वेळी खेडचे आमदार दिलीप मोहिते, पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निर्मलाताई पानसरे, खेड पंचायत समितीच्या उपसभापती ज्योती अरगडे, बाबाजी काळे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, गिरिजा मिटकर, श्यामकांत देशमुख, सुरेश तोडकर, नीता वर्मा आदी तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या वेळी आमदार दिलीप मोहिते म्हणाले की, डॉ. गजानन एकबोटे यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून भोसे येथे डी. फार्मसी, बी. फार्मसी, इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू करावे. मंत्री वळसे पाटील व खेड तालुक्याचा आमदार या नात्याने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. या वेळी भाऊसाहेब कुटे, श्यामकांत देशमुख, सुरेश तोडकर, शीतल चव्हाण, ज्ञानेश्वर मुंगसे, सुनील ओव्हाळ, उमा कुटे, राजीव कुटे, सुरेश लोणारी आदी उपस्थित होते.



भोसे (ता. खेड) : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सद्गुरू बापूसाहेब मिटकर मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचे उद्घाटन करताना कामगारमंत्री दिलीप वळसे पाटील. या वेळी उपस्थित मान्यवर.

Pune, District-Today
03/03/2020 Page No. 4

सकाळ

# वाढीव शुल्क घेतल्यास कारवाई

## महाविद्यालयांबाबत विद्यापीठाची भूमिका; शुल्कवाढ १० ते २० टक्के

**पुणे, ता. २ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अनुदानित व विनाअनुदानित सर्वच अभ्यासक्रमांची शुल्कवाढ केली आहे. मात्र, महाविद्यालयांनी ठरवून दिलेल्या शुल्काऐवजी अन्य कोणत्याही कारणाने विद्यार्थ्यांकडून अधिकचे पैसे घेतले, तर त्यांच्यावर थेट कारवाई केली जाईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.**

**“ विद्यापीठाकडे भरपूर निधी उपलब्ध आहे, त्याचा धड वापरही केला जात नाही. अशा वेळी शुल्कवाढ करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांवर अन्याय केला आहे, त्यामुळे ही शुल्कवाढ मागे घ्यावी, अन्यथा आंदोलन करू.**
**– कुलदीप आंबेकर,** स्टुडंट हेल्पिंग हँड



पुणे विद्यापीठाने नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अभ्यासक्रमांच्या शुल्क निश्चितीसाठी माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. २०११-१२ पासून अनेक महाविद्यालयांनी शुल्कवाढ केली नव्हती. या काळात प्रशासकीय खर्च, देखभाल खर्च, प्रयोगशाळेचे साहित्य यात वाढ झालेली असून प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चांगले वेतन देता यावे याचा विचार करून शुल्कवाढ करणे गरजेचे असल्याची शिफारस केली होती. हा अहवाल व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्याने २०२०-२१च्या शैक्षणिक वर्षापासून ही शुल्कवाढ लागू होणार आहे. पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यांमधील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना ही वाढ लागू होणार आहे.

समितीचे अध्यक्ष डॉ. माळी म्हणाले, “पुणे विद्यापीठात विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या मोठी आहे, तेथील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा व प्राध्यापकांना चांगले वेतन मिळावे यासाठी ही रचना करण्यात आली आहे. यामध्ये साधारणतः १० ते २० टक्के शुल्कवाढ झाली आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेले शुल्कच महाविद्यालयांना घ्यावे लागेल. याचे उल्लंघन करून जास्त शुल्क घेतल्यास महाविद्यालयावर कारवाई केली जाईल.”

“समितीने अभ्यासपूर्ण शुल्कासंदर्भात निर्णय घेतला आहे. शुल्कवाढ न म्हणता शुल्कनिश्चिती म्हणून याकडे पाहणे योग्य ठरेल. या निर्णयाने सर्व महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांच्या शुल्कात एकसंधता आली आहे,” असे प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले.

**एक अभ्यासक्रम एक शुल्क**

पुणे विद्यापीठाशी संलग्न संस्थांमधील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रमासाठी शुल्क निश्चीत केले आहे. यामध्ये अनुदानित किंवा विनाअनुदानित संबंधित अभ्यासक्रमाचे शुल्क संपूर्ण विद्यापीठात एकच असणार आहे. महाविद्यालयानुसार शुल्कात बदल होणार नाही. जर हे शुल्क महाविद्यालयांना कमी वाटत असेल, तर त्यांना पुढच्या वर्षी शुल्कवाढीचा प्रस्ताव सादर करता येईल. यंदा विद्यापीठाने ठरवून दिलेलेच शुल्क घ्यावे लागणार आहे.

Pune, Main
03/03/2020 Page No. 3

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

पुढारी

### विद्यापीठ अधिसभा दोन दिवस होण्याची शक्यता

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा दोन दिवस करण्यास विद्यापीठ प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यासाठी अधिसभा दोन दिवस घेण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी केली होती.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा १४ मार्चला होणार आहे. विद्यापीठाच्या नियोजनानुसार ही अधिसभा एकाच दिवसाची होणार होती. मात्र, अधिसभेमध्ये विविध विषय मांडले जात असल्याने अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे दोन दिवसांची अधिसभा घेण्याची मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्यानंतर आता विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी अधिसभा सदस्यांना पत्र पाठवून आवश्यकतेनुसार रविवारी (१५ मार्च) अधिसभा सुरू ठेवता येईल, असे कळवले आहे. त्यामुळे यावेळी अर्थसंकल्पीय अधिसभा दोन दिवस होण्याची शक्यता आहे.



Pune Edition
4 Mar, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com

पुढारी

### मराठी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ सरसावले

#### कतारमध्ये सप्टेंबरमध्ये शैक्षणिक केंद्र

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दोहा (कतार) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून येत्या सप्टेंबर महिन्यात शैक्षणिक केंद्र सुरू करण्यासाठी कतार शासनाशी सामंजस्य करार झाला आहे. याबाबत शासन सकारात्मक असून, विद्यापीठ येत्या दोन ते तीन दिवसांत शासनाला प्रस्ताव सादर करणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून दोहा प्रोफेशनल सर्विसेस होल्डिंग डब्लू. एल.एल. दोहा, कतार या संस्थेने कतार येथील शासनाशी सामंजस्य करार केलेला आहे. या प्रस्तावाला कतार शासनाने परवानगी दिली असून, राज्य शासन याबाबत सकारात्मक आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा, यासाठी राज्य शासन सहकार्य करील, त्यानंतर विद्यापीठाने केंद्र शासनाच्या परवानगीची प्रक्रिया जलदगतीने करून हे शैक्षणिक केंद्र लवकर सुरू करावे, असे आदेश उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत.

यासंदर्भात डॉ. करमळकर म्हणाले, सहा महिन्यांपूर्वीच दोहा प्रोफेशनल सर्विसेस होल्डिंग डब्लू.एल.एल. दोहा, कतार या संस्थेकडून प्रस्ताव आला होता. त्या ठिकाणी कतारीयन लोकांपेक्षा भारतीय लोकांची संख्या अधिकतर आहे. तिथे परकीय विद्यापीठे



जास्त आहेत; परंतु आशियायी विद्यापीठे नाहीत. विशेष म्हणजे अमेरिकन रेटिंगनुसार पहिल्या पाच विद्यापीठांत पुणे विद्यापीठ आहे. त्यामुळे मी शासनाकडे पाठपुरावा केला. याला शासनाचा सकारात्मक प्रतिसाद लाभला. विद्यापीठ कोणतीही गुंतवणूक करणार नाही. भौतिक सुविधा त्यांनी पुरवायच्या आहेत.

मनुष्यबळ विद्यापीठ निवडणार असून, त्यांचे पगार कतारच्या संस्थेने करायचे आहेत. त्याचबरोबर अभ्यासक्रमांच्या शुल्कामधून २० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यायची, अशा प्रकारचा प्रस्ताव आहे. सप्टेंबरात केंद्र सुरू करण्याबाबत तयारी असून, तोपर्यंत परवानग्या घेण्यात येणार आहेत.

शासनाला ज्यांच्याबरोबर विद्यापीठ करार काय करतेय, त्यांचे क्रेडिन्शीयल काय आहेत, तसेच शासनाला विद्यापीठाला निधी द्यायला लागू नये आणि विद्यापीठाचीही फारशी गुंतवणूक होऊ नये, अशी अपेक्षा असते. तशाप्रकारचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाला येत्या दोन ते तीन दिवसांत देणार असल्याचे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

**कतार शिक्षणकेंद्रात राबविण्यात येणारे अभ्यासक्रम**

पदवी, पदविका, सांस्कृतिक कार्यक्रम, सहयोगाने भाषा कार्यक्रम, शिक्षक - विद्यार्थी आदानप्रदान, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक कार्यक्रम, विविध कार्यशाळा इ. अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

My Pune Edition
4 Mar, 2020 Page No. 7
Powered by : erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

# शोधनिबंध शासनाच्या विरोधातील नकोत

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : 'शासनाच्या किंवा शासकीय संस्थांच्या विरोधी सूर असलेले शोधनिबंध अथवा लेख प्रकाशित करण्यात येऊ नयेत,' असा फतवा पुण्यातील एमआयटी विश्वशांती विद्यापीठाने काढला आहे. कुलगुरूंनी मान्यता दिलेलेच शोधनिबंध प्राध्यापकांना प्रकाशित करता येतील, असेही विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

पुण्यातील एक खासगी विद्यापीठ प्रदुषणमुक्तीसाठी महायज्ञाचे आयोजन करण्यावरून वादग्रस्त ठरल्यानंतर आता पुण्यातील दुसरे खासगी विद्यापीठाचे परिपत्रक प्राध्यापकांमध्ये चर्चेत आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाने शासन किंवा शासकीय संस्थांच्या विरोधातील शोधनिबंध, लेख प्रकाशित करण्यावर निर्बंध घातले आहेत. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने मंगळवारी काढले. 'कुणाच्याही भावना दुखवतील, राजकीय, धार्मिक, सामाजिक वाद निर्माण होतील असे काहीही निबंधांमध्ये असू नये. मजकूर पूर्णपणे शैक्षणिक असावा, त्याचबरोबर पूर्वग्रह दूषित नसावा,' असेही विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या प्राध्यापकांना शोधनिबंध किंवा लेख प्रकाशित करण्यापूर्वी कुलगुरुंची संमती घ्यावी लागणार आहे. कुलगुरुंनी मान्यता दिलेलेच निबंध किंवा लेख प्रकाशित करण्यासाठी पाठवता येतील.

### एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा फतवा

> 'शोधनिबंधांचा दर्जा राखण्यासाठी त्याची विविध स्तरावर तपासणी होणे आवश्यक आहे. प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केला तरीही ते संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. आमची संस्था ही संपूर्णपणे अराजकीय आहे. त्यामुळे परिपत्रकाचा राजकीय अर्थ काढणे चुकीचे आहे. ते परिपत्रक प्राध्यापकांना शोधनिबंध प्रसिद्ध करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी आणि दर्जेदार निबंध प्रकाशित व्हावेत यासाठी आहे.'
>
> – डॉ. प्रशांत दवे, कुलसचिव, एमआयटी विश्वशांती विद्यापीठ

'अशा प्रकारचे परिपत्रक ही व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी असल्याचे प्राध्यापकांचे म्हणणे आहे. संस्थेतील प्राध्यापकांबरोबर संस्थेचीही ओळख जोडली जाते. त्यामुळे मजकूर तपासणे योग्य आहे,' असे संस्थेचे म्हणणे आहे.

**परिपत्रक काय म्हणते?**

'शिक्षणसंस्था म्हणून प्राध्यापकांना नियतकालिकांमध्ये शोधनिबंध, लेख प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. हे लेख शैक्षणिक आणि ज्ञानवृद्धी करणारे असणे अपेक्षित आहे.

लेखातील तपशील हे बरोबर असावेत, त्यातून वाचकांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, त्याचा सूर शासनाच्या किंवा शासकीय संस्थांच्या विरोधातील असू नये, ही लेखकांची जबाबदारी असेल.

लेखातील मजकुरामुळे राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक वाद उद्‌भवू नये. मजकूर पूर्वग्रहदूषित नसावा. एमआयटी शांतता, सौहार्दता या तत्वे पाळणारी संस्था आहे. लेख लिहिणे हे लेखकाचे स्वातंत्र्य असले, त्यातील मते ही लेखकाची वैयक्तिक असली तरीही लेखक संस्थेचा घटक असल्यामुळे त्याची भूमिका ही संस्थेची आहे असा गैरसमज होऊ शकतो. त्यामुळे लेख किंवा निबंध प्रसिद्ध करण्यापूर्वी लेखकाने तो विभाग प्रमुख, प्र-कुलगुरू, कुलगुरू यांच्याकडे जमा करावा. कुलगुरूंनी मान्यता दिलेले निबंध किंवा लेखच प्रकाशित करण्यासाठी पाठवण्यात यावेत.

लोकसत्ता Wed, 04 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49625475

# Colleges told to resolve exam related queries before referring pupils to SPPU

Ardhra.Nair@timesgroup.com

Pune: The Savitribai Phule Pune University (SPPU) on Tuesday directed exam controllers to address queries of students at the college-level or collect their forms and bring them to the university once a month.

Students from rural Ahmednagar, Nashik and Pune would regularly travel to the SPPU's examination department for a simple mistake in their result or have other examination-related queries.

The university realized many of the students came from economically weaker sections and spent a lot of money and time to reach the exam cell on campus. SPPU had then released a circular telling colleges to appoint an exam controller so that smaller issues could be resolved at the college-level itself.

But, colleges would still send their students to SPPU, following which the university directed them to ensure the exam controller solved the queries.

An SPPU official said, "Hundreds of students were coming to the campus with various problems, which could have easily been solved at the college-level. But, since they were not being resolved, the students had no choice but to spend money and visit the university with their grievances. Another major problem was the students were not aware of certain rules and regulations about resolving issues. So, they would visit multiple times for the same problems."

The official said that examination officers were aware of how to present a problem and seek its resolution.

"They know what documents to bring. So, when a student submits his/her grievance, the examination officer can get him/her to submit all the documents required to resolve the issue. Also, if the examination officers see that a lot of students have the same type of problem, then they can also suggest measures to the university to ensure it doesn't repeat in the future. Or, the university could put a measure in place specific to that college," the official said.

File photo



The exam controllers will solve students' queries at the college-level

Times of India 5-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION



# शुल्कवाढीला विद्यार्थी संघटनांचा विरोध

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसासाठी येत्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून शुल्कवाढ करण्याच्या निर्णयाला स्टुडंट हेल्पिंग हँडने आणि राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना यांना विरोध केला आहे.

महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्यासाठी माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने त्यांचा अहवाल कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर केला. या अहवालावर शिफारशी व्यवस्थापन परिषदेने स्वीकारून ही शुल्कवाढ करण्यात आली आहे. विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांमधील अनुदानित आणि विनाअनुदानित तत्त्वावरील पदवी, पदव्युत्तर, पदविका, प्रमाणपत्र, एमफिल, पीएचडी यासह सर्व अभ्यासक्रमांना लागू करण्यात आली आहे.

विद्यापीठाने येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्व अभ्यासक्रमांना शुल्कवाढ करण्याचा घेतलेला निर्णय योग्य नाही. हा निर्णय विद्यार्थी आणि पालकांवर अन्याय करणारा आहे. आर्थिक मंदीच्या काळात शुल्कवाढ परवडणारी नाही. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. याचा गांभीर्याने विचार करून विद्यापीठाने शुल्कवाढ करू नये नसे मत स्टुडंट हेल्पिंग हँडचे अध्यक्ष कुलदीप आंबेकर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ प्रशासनाने केलेली शुल्कवाढ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना परवडणारी नाही. एका बाजूला विद्यापीठ प्रशासन टॅब खरेदीसाठी लाखो रुपयांची उधळपट्टी करते. दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करणारी शुल्कवाढ करण्यात येते. हा विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय आहे. त्यामुळे विद्यार्थीहिताचा विचार करून ही शुल्कवाढ रद्द करावी, अशी मागणी विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्याकडे केली असल्याचे राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ऋषी परदेशी यांनी सांगितले.

Keari 5-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

सकाळ

# नवीन शैक्षणिक धोरण क्रांती आणेल

### मुख्य नवकल्पना अधिकारी डॉ. अभय जेरे यांचे प्रतिपादन

**पुणे, ता. ५ : देशातील वाढत्या बेरोजगारीला लगाम घालण्याचे आणि विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकासाला चालना देण्याचे काम नवीन शैक्षणिक धोरण करेल, असा विश्वास देशाचे मुख्य नवकल्पना अधिकारी डॉ. अभय जेरे यांनी व्यक्त केला आहे. फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये आयोजित मनुष्यबळ विकास अधिकाऱ्यांच्या परिषदेत ते बोलत होते.**

एनएचआरडीएनच्या या सहाव्या लर्निंग आणि डेव्हलपमेंट समिटमध्ये पुणे चाप्टरचे अध्यक्ष आनंद खोत, उपाध्यक्ष अमन राजाबळी, महेश आठवले, एमआयटीचे कुलगुरू डॉ.एन. टी. राव, डी. पी. सिंग आदी उपस्थित होते.

देशात व्यावसायिक अभ्यासक्रमातील २० टक्के आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील तीन टक्के विद्यार्थी नोकरीसाठी पात्र ठरतात. आपल्याला हे चित्र बदलायचे असेल तर, विद्यार्थ्यांच्या समस्यांना समाधान शोधणाऱ्या कौशल्याचा विकास करावा लागेल. त्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात रचनात्मक तरतुदी केल्या असून, मनुष्यबळ विकास क्षेत्रात हे धोरण क्रांती आणेल, असे डॉ. जेरे यांनी सांगितले. ते म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण लोकांच्या विचाराधीन असताना सुमारे दीड लाख अभिप्राय आले. त्यांचा अभ्यास करून तयार केलेला सुधारित मसुदा अंतिम टप्प्यात आहे.



**फर्ग्युसन महाविद्यालय : सहाव्या एनएचआरडीएल परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. अभय जेरे. या वेळी (डावीकडून) डॉ.एन. टी. राव, महेश आठवले व आनंद खोत.**

आम्ही कायद्याची वाट न बघता राष्ट्रीय मूल्यांकन आणि नवकल्पना धोरणाला आम्ही सुरुवात केली आहे. त्या अंतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी स्टार्टअपसाठी आवश्यक प्रशिक्षण आणि सुविधा पुरविण्यात येत आहे.'' उद्योग, आयटी, सेवा, वाणिज्य आदी क्षेत्रांतील कंपन्यांचे मनुष्यबळ विकास अधिकारी परिषदेत प्रशिक्षण आणि विकास यावर चर्चा करणार आहेत.

**रोबोही गाण्यावर थिरकला...**

शाहरुखखानच्या 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' या चित्रपटातील गाण्यावर केवळ माणूसच नाही तर रोबोही 'फिदा' आहे. परिषदेत 'चिंटू' नावाच्या रोबोने प्रेक्षकांचे स्वागत डीडीएलजेमधील गाण्यावरील नृत्याने केले. त्याची चालण्याची आणि बोलण्याच्या पद्धतीने प्रेक्षकांना अचंबित केले.

**डॉ. जेरे म्हणाले...**

- देशातील अभियांत्रिकीचे विद्यार्थ्यांमध्ये समस्यांवर उपायशोधण्याच्या कौशल्याचा अभाव
- विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना वाव देणे आणि त्याला पूरक वातावरण निर्माण करण्याची गरज
- इंटर्नशिप पॉलिसीची अंमलबजावणी करण्यात येत आहे
- उद्योगांनी आणि कंपन्यांनी पुढील वर्षी २० लाख विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्यासाठी तयार राहावे
- ग्लोबल इनोव्हेशन हब होण्याची देशामध्ये क्षमता

**देशातील मनुष्यबळ विकासाच्या धोरणांची चर्चा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. या क्षेत्रात तंत्रज्ञानाने केलेले बदल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा मनुष्यकेंद्रित वापरासंबंधीची चर्चा आणि प्रशिक्षण या परिषदेतून होणार आहे.**

**- आनंद खोत,** अध्यक्ष पुणे चाप्टर, एनएचआरडीएन

Pune, Pune-Today
06/03/2020 Page No. 7

# सिनेट सदस्यांच्या कार्यशाळेचा मुद्दा वादाचा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठाची अर्थसंकल्पीय सभा १४ मार्चला होणार आहे. या पार्श्वभूमीवर सिनेटच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विषय प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सिनेट सदस्यांची कार्यशाळा स्व. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये घेण्याचा ठराव सिनेटमध्ये मांडण्यात आला असून यासह विविध विषयांवर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

विवेक बुचडे यांनी सिनेट सदस्यांची कार्यशाळा आयोजित करण्याबाबत ठराव मांडला आहे. चालू वर्षात सिनेट सदस्यांची कार्यशाळा यशदाच्या धर्तीवर मुंबईतील स्व. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये घेण्याचा ठराव बुचडे यांनी मांडला आहे. स्व. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही संस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाशी संबंधित आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी सार्वजनिक विद्यापीठ



कायद्यानुसार मुंबई विद्यापीठातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची प्रशिक्षण कार्यशाळा म्हाळगी प्रबोधिनीमध्ये आयोजित करण्याच्या मुद्द्यावरुन गोंधळ झाला होता. त्यानंतर मुंबई विद्यापीठाला ही कार्यशाळा रद्द करावी लागली होती.

## सदस्यांकडून विविध ठराव

विद्यापीठाच्या गुणपत्रिकांवर विद्यार्थ्यांचे छायाचित्र छापावे. त्यामुळे गुणपत्रिकेचा गैरवापर करता येणार नाही, पुणे विद्यापीठांच्या परीक्षांचे मानधन हे महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना ऑफलाइन पद्धतीने देणे, असे ठराव सिनेट सदस्य संतोष ढोरे यांनी मांडले आहेत. केंद्र सरकारकडून शिक्षणावर अत्यल्प आर्थिक तरतूद केली जाते. परिणामी शैक्षणिक कामासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी केवळ शैक्षणिक कामासाठीच वापरावा, असा ठराव शशिकांत तिकोटे यांनी मांडला आहे. विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगला मिळाला असून या महाविद्यालयातील शिक्षकांच्या तक्रारी आहेत. या तक्रारींचे निरसन करुन त्या सोडवण्यासाठी विद्यापीठाने समिती स्थापन करावी, असा ठराव डॉ. सोपान राठोड यांनी मांडला आहे.

या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांची कार्यशाळा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत होण्याच्या मुद्द्यावरुन गोंधळ होण्याची शक्यता आहे. यासोबत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे या महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या गरजू, हुशार विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील नामांकित बँकेकडून शैक्षणिक कर्ज मिळण्यासाठी विद्यापीठाने सर्वतोपरी मदत करण्याचाही ठराव बुचडे यांनी मांडला आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Thu, 12 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49875106

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

### अधिसभा काही काळासाठी पुढे ढकलण्याची मागणी

**पुणे** - राज्यात करोना विषाणूचा प्रभाव वाढत असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची १४ मार्च रोजी होणारी अधिसभा काही काळासाठी पुढे ढकलावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे केली. दरम्यान, पुणे विद्यापीठाचे २०२०-२१ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी व पुढील वर्षाच्या आर्थिक खर्च व इतर गोष्टींची मान्यता घेण्यासाठी १४ मार्च होणारी अधिसभा महत्त्वाची आहे. अधिसभा सदस्य प्रा. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे यांनी पत्रक काढून पुण्यात करोनाचा प्रभाव वाढत असल्याने अधिसभा स्थगित करावी. करोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतर ही सभा घेतली जावी, अशी मागणी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

प्रभात Fri, 13 March 2020
epaper.eprabhat.net/c/499132

लोकमत

कोरोनामुळे मिळाला नाही व्हिसा : विद्यापीठाची ऑनलाइन तत्परता

# इराकच्या विद्यार्थ्याची 'ऑनलाइन' परीक्षा

राहुल शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना कोरोनाचा फटका बसत असून व्हिसा मिळत नसल्यामुळे इराकमधील एका विद्यार्थ्याला पीएच.डी.ची मौखिक परीक्षा (व्हायवा) देण्यासाठी भारतात येता आले नाही. त्यामुळे विद्यापीठाची परवानगी घेऊन या विद्यार्थ्याला गुरुवारी ऑनलाइन पद्धतीने 'स्काईप'द्वारे पीएच.डी.ची मौखिक परीक्षा द्यावी लागली.

कोरोना विषाणूचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेल्या देशातील नागरिकांना व्हिसा देण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. इराकमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळल्याने इराकमधील नागरिकांना भारतात येण्याबाबत बंधने घालण्यात आली आहेत. मात्र, विद्यापीठाच्या वाणिज्य विभागात पीएच.डी. करणाऱ्या इराक देशातील बगदाद येथील अब्बास अदिल इब्राहिम या विद्यार्थ्याची मौखिक परीक्षा मार्च महिन्यात घेतली जाणार होती. मात्र, कोरोनामुळे त्याला प्रत्यक्षात पीएच.डी.च्या मौखिक परीक्षेला प्रत्यक्षात उपस्थित राहता येणे शक्य नव्हते. त्यामुळे या विद्यार्थ्याने विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे ई-मेलद्वारे विनंती केली. कुलगुरुंनी ही विनंती मान्य केली. त्यामुळे गुरुवारी या विद्यार्थ्याने तज्ज्ञ समितीसमोर मौखिक परीक्षा दिली.

अब्बासचे मार्गदर्शक डॉ. अरुण गायकवाड म्हणाले, "विद्यापीठाचे कुलगुरु, प्र-कुलगुरु व अधिष्ठाता यांनी विद्यार्थी हिताचा विचार करुन ऑनलाइन मौखिक परीक्षा घेण्यास परवानगी दिली. त्यामुळे गुरुवारी अब्बास पीएच.डी.ची मौखिक परीक्षा देऊ शकला. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने मौखिक परीक्षा देणारा अब्बास हा पहिला विद्यार्थी आहे. गेल्या तीन वर्षांत त्याने चार्टर्ड अकाउंटंट्स यांच्याकडून महत्त्वाची माहिती गोळा करुन पीएच.डी.चा प्रबंध सादर केला. तसेच, परीक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. अब्बासने केलेल्या सादरीकरणावर परीक्षकांनी समाधान व्यक्त केले. तसेच अब्बास याला पीएच.डी. पदवी देण्याबाबत विद्यापीठाकडे शिफारस करणार असल्याचे सांगितले.

### तीन वर्षांत शोधप्रबंध सादर केला



अब्बास इब्राहिम या विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या वाणिज्य विभागात ३ ऑक्टोबर २०१६ मध्ये पीएच.डी.साठी नोंदणी केली होती. त्याने तीन वर्षांत 'ए स्टडी ऑफ इव्हॅल्युवेशन ऑफ प्रोफेशनल प्रॅक्टिसेस अ‍ॅण्ड इथिक्स सिस्टीम अडॉप्टेड बाय चार्टर्ड अकाउंटंट्स इन पुणे रिजन' या विषयावरील पीएच.डी.चा शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला. त्याला संगमनेर येथील संगमनेर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. गुरुवारी अब्बास याच्या मौखिक परीक्षेस बाह्य परीक्षक म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे शैक्षणिक सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रमोद बियानी, विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. सुप्रिया पाटील आणि प्रा. डॉ. जी. शामला उपस्थित होते.

Pune Main
Page No. 2 Mar 13, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

# निधी आहे; पण खर्च नाही!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध योजनांचे वास्तव

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थी-प्राध्यापकांसाठीच्या विविध योजनांसाठी अर्थसंकल्पात तरतूद असूनही त्याबाबतचा निधी खर्चच झाला नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यामुळे एकीकडे पुरेसा निधी नसल्याने प्रकल्प राबवण्यात अडचणी असल्याचे बोलले जात असताना, दुसरीकडे निधी असूनही खर्च नाही असा प्रकार या निमित्ताने दिसून येत आहे.

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातून योजनांवरील निधी खर्च होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठाकडून प्राध्यापक-विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात. त्यात गरजूंना मदत करण्यासह गुणवत्ता वाढीचाही उद्देश असतो. मात्र, बहुभाषिक संशोधन केंद्र, संशोधन प्रोत्साहन योजना, गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष मदत, विद्यापीठ संशोधन नियतकालिके, इस्रो पुणे विद्यापीठ साहाय्य, विशेष विद्यार्थी सक्षमता केंद्र, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मार्गदर्शन अशा काही योजनांसाठी निधीची अर्थसंकल्पात तरतूद असूनही २०१९-२०मध्ये एकही रुपया खर्च करण्यात आलेला नाही.



> काही योजनांमध्ये प्रस्तावच सादर केले जात नाहीत, तर काही योजनांसाठी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता प्रस्तावांकडून होत नाही, असे असू शकेल. मात्र, प्रत्येक विभागात, प्राध्यापक-विद्यार्थ्यांसमोर अर्थसंकल्प असतो. त्यामुळे योजनांबद्दलची जागरुकता होणे आवश्यक आहे. संबंधित योजनांवर का खर्च होत नाही, याचा आढावा वित्त व लेखा समितीकडून घेतला जाईल.
>
> – **डॉ. एन. एस. उमराणी**, प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाकडून अर्थसंकल्पात या योजनांसाठी पाच लाखांपर्यंतची तरतूद करण्यात आली होती. निधी असूनही खर्च न होण्याचा प्रकार यंदाच नाही, तर गेल्यावर्षीही झाला होता. गेल्यावर्षी या योजनांवरील निधी खर्चाविना पडून राहिल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी विद्यापीठात आणि संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी असतात. विद्यापीठाच्या योजनांपैकी विशेष विद्यार्थी सक्षमता केंद्र, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मार्गदर्शन, गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष मदत या योजना विद्यार्थी हिताच्या असूनही त्यासाठीच्या निधीचा वापर झालेला नाही.

त्याशिवाय औद्योगिक-शासन पुरस्कृत योजनांना अनुरुप अनुदान या योजनेसाठी तर ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, सलग दोन वर्षे हा निधी वापरलाच गेलेला नाही.

लोकसत्ता Sat, 14 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49948565

# विद्यापीठाची अधिसभा स्थगित

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी (१४ मार्च) होणार होती. मात्र, करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी राज्य शासनाने शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतर विद्यापीठाने अधिसभा स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी ही माहिती दिली. विद्यापीठ कायद्यानुसार १५ मार्चच्या आधी विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करून त्याला अधिसभेची मान्यता घ्यावी लागते. करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ही अधिसभा होणार की नाही असा प्रश्न निर्माण झाला होता. काही अधिसभा सदस्यांनीही अधिसभा स्थगित करून नंतर घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती.

राज्य शासनाने शाळा महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय शुक्रवारी सायंकाळी जाहीर केला. त्यानंतर विद्यापीठाकडून अधिसभा स्थगित करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

लोकसत्ता Sat, http

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

पुढारी

### कोरोनामुळे विद्यापीठाची अधिसभा स्थगित

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी राज्य शासनाने शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे विद्यापीठाने संबंधित अधिसभा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली.

विद्यापीठ कायद्यानुसार १५ मार्चच्या आधी विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करून त्याला अधिसभेची मान्यता घ्यावी लागते. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ही अधिसभा होणार की नाही, असा प्रश्न निर्माण झाला होता. काही अधिसभा सदस्यांनीही अधिसभा स्थगित करून नंतर घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती. अखेर राज्य शासनाने शाळा महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय शुक्रवारी सायंकाळी जाहीर केला. त्यानंतर विद्यापीठाकडून अधिसभा स्थगित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.



Pune Edition
14 Mar, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com

### विद्यापीठाची अधिसभा पुढे ढकलली

**पुणे** - करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शनिवारी (दि.१३) होणारी अधिसभेची बैठक (सिनेट) पुढे ढकलली आहे, अशी माहिती विद्यापीठाकडून अधिकृतरित्या देण्यात आली आहे. शहरात करोनामुळे शाळांना सुटी दिली आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाची शनिवारी होणारी अधिसभेची बैठकही पुढे ढकलावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली होती. त्यानंतर विद्यापीठाने सिनेट ठरलेल्या वेळेतच होणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, शुक्रवारी सायंकाळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर येथील शाळा पुढील आदेश येईलपर्यंत बंद ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर विद्यापीठाने अधिसभेची बैठक पुढे ढकलली आहे.

प्रभात Sat, 14 March 2020
epaper.eprabhat.net/c/49948947

### विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांसाठी यंदाही ऑनलाइन प्रवेश परीक्षा

**वेळापत्रक आठवड्याभरात जाहीर करणार**

पुणे, दि. १३ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी मागील शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या ऑनलाइन प्रवेश परीक्षांना उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच, ठिकठिकाणी परीक्षा केंद्रे असल्याने बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना सहजपणे परीक्षा देता आल्या. या पार्श्वभूमीवर या वर्षीसुद्धा पदवी आणि पदव्युत्तर (यूजी व पीजी) परीक्षांसाठी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांनी दिली.



विद्यापीठाच्या आवारात असलेल्या विविध विभागांमध्ये चालणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी गेल्या वर्षीपासून ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेणे सुरू केले. पदवी आणि पदव्युत्तर अशा एकूण ९५ अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आल्या. त्यासाठी राज्याच्या विविध भागांत परीक्षा केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली होती. ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा विद्यार्थ्यांसाठी सोयीची ठरली. त्यांना परीक्षांसाठी पुण्यात येण्याची आवश्यकता नव्हती, तर ते आपल्या गावाजवळ असणाऱ्या केंद्रावर परीक्षा देऊ शकले. त्यामुळे या परीक्षांना खूप चांगला प्रतिसाद लाभला. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षासाठीसुद्धा ऑनलाइन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याबाबतची घोषणा व सविस्तर कार्यक्रम पुढील आठवड्यात जाहीर करण्यात येईल. त्याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल, असे प्रा. करमळकर यांनी सांगितले.

प्रभात Sat, 14 March 2020
epaper.eprabhat.net/c/49949199

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

सकाळ

# पुणे विद्यापीठातील अध्यापन बंद

## नियोजित परीक्षा होणार; अभ्यागतांच्या प्रवेशावर निर्बंध

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने कोरोनासंदर्भात खबरदारीचा उपाय म्हणून अनिश्चित काळासाठी शैक्षणिक विभागांचे अध्यापनाचे कामकाज बंद ठेवण्यात आले आहे. मात्र, प्रशासकीय आणि इतर कामकाज चालू राहणार आहे.

विद्यापीठाच्या वतीने यासंबंधीचे परिपत्रक शनिवारी काढण्यात आले. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जयकर ग्रंथालयासहित सर्व वाचन कक्ष, अभ्यागत निवास, कमवा व शिका योजना, व्यायामशाळा, सर्व क्रीडा सुविधा, पाळणाघर, उद्याने आणि अत्यावश्यक सेवा वगळून इतर वाहनसेवा बंद करण्यात आली आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सुटीच्या काळात अनावश्यकरीत्या फिरण्यास मनाई करण्यात आली आहे. विद्यार्थी फिरताना दिसल्यास त्यांना मूळ गावी जाण्याची सूचना देण्यात येईल, असे प्रशासनाने कळविले आहे.

### परीक्षेसंबंधीचे आदेश विद्यार्थ्यांना कळविणार

विद्यापीठ आणि विभागांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होणार आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र जवळ बाळगावे आणि आवश्यकता असल्यास ते दाखवावे, अशी सूचना प्रशासनाने केली आहे. तसेच, परीक्षेसंबंधी काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास विद्यार्थ्यांना कळविण्यात येणार आहे.

### नागरिकांना प्रवेशास बंदी

विद्यापीठात विनापरवानगी येणाऱ्या अभ्यागतांना या कालावधीत प्रवेश देण्यात येणार नाही.

पान ३ वर »




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : जयकर ग्रंथालयाचा वाचन कक्ष बंद करण्यात आल्यानंतर अभ्यासाचे साहित्य नेण्यासाठी विद्यार्थ्यांची एकच तारांबळ उडाली.

Pune, Pune-Today
15/03/2020 Page No. 1

सकाळ

# पुणे विद्यापीठातील अध्यापन बंद

» पान १ वरून

तसेच, सकाळी आणि संध्याकाळी व्यायाम आणि फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. विद्यापीठातील विद्यार्थी, कर्मचारी, त्यांचे नातेवाईक यांना ओळखपत्र पाहूनच प्रवेश देण्यात येईल, असे प्रशासनाने म्हटले आहे. या काळात प्रवेशद्वारावरील बायोमेट्रिक सुविधा बंद राहील.

सेनापती बापट रस्ता, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, टिळक रस्ता आदी ठिकाणी गर्दी कमी होती. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या खासगी अभ्यासिकांमध्ये आज शुकशुकाट होता. काही क्लासचालकांनी विद्यार्थ्यांना आठवडाभराची सुटी जाहीर केली आहे.

Pune, Pune-Today
15/03/2020 Page No. 3

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

अमित रुके



नेहमी गजबजणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा परिसर 'करोना'मुळे शनिवारी शांत दिसून आला.

### विद्यापीठ बंद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोना विषाणू रोखण्यासाठी उशिरा जागे झालेल्या उच्च शिक्षण संचालनालयाने सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांना लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा वगळता सर्व कामकाज बंद ठेवण्याचे आदेश दिल्यानंतर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक विभाग व महाविद्यालयांना तातडीने निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यापीठात कार्यक्रम व परिषदांसाठी येणारे; तसेच सकाळी आणि संध्याकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना पुढील आदेश येईपर्यंत 'नो एंट्री' राहणार आहे. दरम्यान, विद्यापीठाचे प्रशासकीय आणि त्यांच्याशी संबंधित एवढेच कामकाज सुरू राहणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी विविध सूचनांचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. डॉ. पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागातील अध्यापनाचे कामकाज शनिवारपासून पुढील आदेश मिळेपर्यंत बंद राहणार आहेत. मात्र, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर कामकाज सुरू राहणार आहेत. शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना सुट्टी दिलेली आहे. मात्र, त्यासोबतच त्यांना अनावश्यक न फिरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थी फिरताना दिसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विद्यापीठ आवारात वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित कालावधीत त्यांच्या मूळ गावी जाता येणार आहे. दरम्यान, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शक्यतो वसतिगृहाबाहेर जाऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या काळात विद्यापीठात आयुका गेटमार्फत येण्यासाठी असणारी बायोमेट्रिक प्रणाली बंद राहणार असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

#### फिरण्यासही बंदी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सकाळी आणि संध्याकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना संबंधित कालावधीत फिरता येता येणार नाही. विद्यापीठाच्या सर्व प्रवेशद्वारातून केवळ विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यापीठातील रहिवासी यांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाणार आहे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

#### परीक्षार्थींना बंधने नाहीत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व विभागांच्या इतर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. त्यामुळे संबंधित बंधने परीक्षार्थ्यांना लागू राहणार नाही. त्यासाठी त्यांना हॉलतिकीट सोबत बाळगावे लागेल. परीक्षेबाबत सरकारचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास कळविण्यात येणार असल्याचे देखील विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. खासगी शैक्षणिक संस्था, अभिमत व खासगी विद्यापीठांच्या परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा होणार आहेत.

**Maharashtra Times 15-3-2020**

### विद्यापीठ प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांतील पदवी (यूजी) आणि पदव्युत्तर पदवी (पीजी) अभ्यासक्रमांसाठी यंदाही ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेण्यात येणार असून, येत्या काही दिवसांत प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात चालणाऱ्या विविध अभ्यासक्रमांसाठी गेल्या शैक्षणिक वर्षांत घेण्यात आलेल्या ऑनलाइन प्रवेश परीक्षांना उत्तम प्रतिसाद मिळाला. या पार्श्वभूमीवर यंदाही विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ऑनलइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहेत. याबाबतचे वेळापत्रक येत्या आठवड्याभरात जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

ऑनलाइन प्रवेश परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना परीक्षांसाठी पुण्यात येण्याची आवश्यकता नव्हती, तर ते आपल्या गावाजवळ असणाऱ्या केंद्रावर परीक्षा देऊ शकले. त्यामुळे या परीक्षांना चांगला प्रतिसाद लाभला. या ९५ अभ्यासक्रमांसाठी सुमारे २६ हजार ५०० विद्यार्थी बसले होते. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने गुणवत्तेतही वाढ झाली. या परीक्षेच्या अशा जमेच्या बाजू ठरल्या. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षासाठीसुद्धा ऑनलाइन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याबाबतची घोषणा व सविस्तर कार्यक्रम पुढील आठवड्यात जाहीर करण्यात येईल. त्याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

#### प्रवेश शैक्षणिक विभागांद्वारे

पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीच्या ऑनलाइन प्रवेश परीक्षेचे नियोजन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. मात्र, या व्यतिरिक्त डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा या संबंधित अभ्यासक्रम सुरू असणाऱ्या विभागांकडून ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येतील. या अभ्यासक्रमांची संख्या ५५ इतकी आहे, असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.

**Maharashtra Times 15-3-2020**

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

## महाविद्यालये बंद ठेवण्याच्या आदेशाबाबत प्रशासकीय गोंधळ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने दिल्यानंतरही केवळ उच्च शिक्षण संचालनालयाची सूचना न आल्याचे कारण पुढे करत अनेक महाविद्यालये, खासगी शिक्षण संस्थांनी कामकाज सुरू ठेवले. त्यामुळे प्रशासकीय स्तरावरील गोंधळ या निमित्ताने दिसून आला.

करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील शाळा आणि महाविद्यालये पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय शुक्रवारी जाहीर केला. त्यानंतर पुणे विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांनीही पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती देत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

**संवादात उणीव...**

महाविद्यालये, शिक्षण संस्था बंद ठेवण्याचे आदेश शासनाच्या स्तरावरून आणि शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत. मात्र, हा आदेश सर्व महाविद्यालयांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचलेला नाही. त्यामुळे शासकीय स्तरावरून होत असलेल्या कार्यवाहीमध्ये संवादाची उणीव राहात असल्याचेही दिसून येत आहे.

मात्र, महाविद्यालये बंद ठेवण्यासंदर्भातील परिपत्रक उच्च शिक्षण संचालनालयाकडून शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात न आल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून शनिवारी शहरातील नामांकित महाविद्यालये आणि खासगी विद्यापीठांनी शैक्षणिक कामकाज सुरू ठेवले.

दरम्यान, उच्च शिक्षण संचालनालयाकडून शनिवारी परिपत्रक प्रसिद्ध केल्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानेही संलग्न महाविद्यालयांना शैक्षणिक कामकाज बंद ठेवण्याचे निर्देश परिपत्रकाद्वारे दिले.

लोकसत्ता Sun, 15 March 2020 https://epaper.loksatta.com/c/49982031

लोकमत

संडे अँकर । विद्यापीठ, महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना सुटी नाही

## विद्यार्थ्यांना सुटी; शैक्षणिक कामकाज सुरू

"कोरोनाचा फैलाव वाढू नये; या उद्देशाने महाविद्यालयातील अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाविद्यालयांना सुटी असल्यामुळे विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये. घरीच बसून अभ्यास करणे अपेक्षित आहे. मात्र, विद्यापीठ, महाविद्यालयांतील प्राध्यापक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुटी दिलेली नाही. त्यांनी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत इतर शैक्षणिक कामे करावीत. परीक्षांच्या वेळापत्रकात सध्या कोणताही बदल केलेला नाही, परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होईल.

- डॉ. मोहन खताळ, पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक.

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांना सुटी देण्याचा निर्णय घेतला असला तरी केवळ विद्यार्थ्यांना सुटी असणार आहे. महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुटी देण्यात आलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गात शिकवण्याचे काम सोडून विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये इतर सर्व शैक्षणिक कामे सुरु राहणार आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विद्यापीठांचे कुलगुरु, शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांची शनिवारी बैठक घेण्यात आली. यावेळी महाविद्यालये बंद ठेवण्याबरोबरच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची विद्यार्थ्यांमध्ये जागृती करून या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन म्हैसेकर यांनी यावेळी केले. बैठकीस राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे अध्यक्ष तथा भारती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, शिक्षण विभागाचे सहसंचालक मोहन खताळ, उपायुक्त प्रताप जाधव आदी उपस्थित होते. परदेशांचा प्रवास करुन आलेल्या विद्यार्थ्यांनी क्वारंटाईन (विलगीकरण) करावे. या विद्यार्थ्यांनी स्वत:हून घरीच १५ दिवस स्वतंत्र राहावे, कुटुंबात किंवा समाजात मिसळू नये, असे नमूद करुन डॉ. म्हैसेकर म्हणाले, की परदेशातून आलेल्या व वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार विलगीकरण कक्ष स्थापन करावा. या कक्षातील विद्यार्थ्यांचा इतर विद्यार्थ्यांशी संपर्क येणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

Hello Pune
Page No. 3 Mar 15, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

लोकमत

### विद्यापीठातील प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मागील वर्षाप्रमाणे या वर्षीसुद्धा ऑनलाइन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेतली जाणार असून, याबाबतचे वेळापत्रक येत्या आठवडाभरात जाहीर केले जाणार आहे, असे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

मागील वर्षी विद्यापीठातील विभागांमधील प्रवेशासाठी घेतलेल्या ऑनलाइन प्रवेश परीक्षेस उत्तम प्रतिसाद मिळाला. विविध ठिकाणी परीक्षा केंद्र असल्यामुळे बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना सहजपणे परीक्षा देता आल्या. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशसुद्धा ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेऊन दिले जाणार आहेत.

विद्यापीठातर्फे गेल्या वर्षी पदवी आणि पदव्युत्तर अशा एकूण ९५ अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेतली होती. महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून सुमारे २६ हजार ५०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यांना पुण्यात येण्याची आवश्यकता भासली नाही. विद्यापीठाने सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेण्याचे निश्चित केले आहे. वेळापत्रक पुढील आठवड्यात संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे.



**विद्यापीठाच्या** पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रवेश मात्र संबंधित विभागाकडून थेट दिले जाणार आहेत. या अभ्यासक्रमांची संख्या ५५ इतकी आहे, असेही नितीन करमळकर यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Mar 16, 2020
Powered by: erelego.com

### विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलल्या

#### १ एप्रिलनंतरच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेली सर्व विद्यापीठे, महाविद्यालये यांच्या दि. ३१ मार्चपर्यंत होणाऱ्या सर्व परीक्षा व प्रात्यक्षिके पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दि. १ एप्रिलपासूनच्या परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशा सूचना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आल्या आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी दिलेल्या आदेशानुसार, राज्यातील नागरी भागासोबतच ग्रामीण भागातील तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित,



कायम विनाअनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये, तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, वसतिगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था, वसतिगृहे ३१ मार्चपर्यंत बंद राहतील. मात्र विद्यापीठाचे कुलगुरु, उपकुलगुरु, कुलसचिव, उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे, तंत्रनिकेतनांचे प्राचार्य, संचालक, अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयांमध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ३१ मार्चपर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. संबंधित सूचनांचे पालन करण्यात यावे आणि त्याचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा, अशा प्रकारचे आदेश उच्चशिक्षण संचालनालयाकडून देण्यात आले आहेत.

> कोरोना विषाणू साथीच्या पार्श्वभूमीवर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ३१ मार्चपर्यंतच्या सर्व परीक्षा (विद्यापीठ आवारातील विभागांच्या व महाविद्यालयांमधील) पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल. १ एप्रिलनंतरच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहेत.
>
> - **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**अध्यापकांना २५ मार्चपर्यंत 'वर्क फ्रॉम होम'**

शासनाच्या आदेशानुसार तंत्रशास्त्र विद्यापीठे, तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कला महाविद्यालये यामधील सर्व अध्यापक दि. २५ मार्चपर्यंत घरी राहून कामकाज (वर्क फ्रॉम होम) करू शकतील. परंतु काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठांचे कुलगुरू, उपकुलगुरू, कुलसचिव, उपकुलसचिव तसेच महाविद्यालयांचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य, संचालक, अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

**Pudhari 17-3-2020**

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

# विद्यापीठांच्या संचित निधीवर राज्य शासनाचा डोळा?

## शिल्लक निधी परत करण्याचे आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील स्वायत्त विद्यापीठांनी त्यांच्या बँक खात्यातील शिल्लक रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आदेश राज्य शासनाकडून देण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विद्यापीठांच्या संचित निधीवर राज्य शासनाचा डोळा आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासनाचे कार्यासन अधिकारी प्रवीणकुमार पवार यांनी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे (रुसा) संचालक, सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि उच्च शिक्षण संचालकांना पत्र पाठवले आहे. 'सर्व शासकीय कार्यालये आणि शासन अनुदानित संस्था यांच्याकडील बँक खात्यामध्ये शिल्लक असलेली रक्कम १६ मार्च २०२० पर्यंत विभागाच्या जमा

> विद्यापीठांकडे राज्य शासनाचे कोणतेही अनुदान नसल्यामुळे निधी शासनाकडे जमा करण्याचे पत्र विद्यापीठांना का पाठवले? शासनाची विद्यापीठांच्या निधीवर नजर असल्यास त्याला कायद्याने विरोध केला जाईल.
>
> **- राजेश पांडे,**
> **व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

लेखाशीर्षाखाली शासन खाती जमा करावी. ज्या विभागाकडून कार्यवाही करण्यात येणार नाही, अशा विभागांना आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षासाठी विविध उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पीत केलेल्या अनुदानाचे वाटप करण्यात येणार नाही, असे *(पान २ वर)*

लोकसत्ता Wed, 18 March 2020
https://epaper.loksatta.com/c/50

# विद्यापीठ, महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परिस्थितीनुसार 'वर्क फ्रॉम होम'

**मुंबई, दि. १७ -** राज्यात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून विद्यापीठे, महाविद्यालये ३१ मार्चपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आपत्कालीन परिस्थिती वगळता प्राध्यापकांना 'वर्क फॉर्म होम' ची परवानगी देण्यात आली आहे. याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही परिस्थितीनुसार अशी परवानगी देण्याबाबत शासन निर्णय घेईल. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनात भीती किंवा गैरसमज बाळगू नये, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले.

विद्यापीठे, महाविद्यालये बंद असले तरी विद्यापीठाचे कुलगुरु, उपकुलगुरु, कुलसचिव, उपकुलसचिव तसेच महाविद्यालये/तंत्रनिकेतनचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता, यांनी नियमितरित्या कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक असते. परंतु शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनात भीतीचे वातावरण आणि गैरसमज करून घेऊ नये. शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करुन आणि राज्यातील करोनाचा वाढता प्रादुर्भाव यासर्व परिस्थितीचा विचार करून आवश्यकतेप्रमाणे प्राध्यापकांप्रमाणे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही वर्क फॉर्म होम निर्णय तातडीने घेण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले.

प्रभात Wed, 18 March 2020
epaper.eprabhat.net/c/50085878

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

सकाळ

# महाविद्यालयांची पुनर्तपासणी

## शिक्षण आयुक्तांचा आदेश; नियमांची पूर्तता न करताच वर्ग सुरू

संतोष शाळिग्राम : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १७ : शैक्षणिक सुविधांचा अभाव ठेवत नियमभंग करून वर्ग चालविणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी होऊनही शिक्षण विभागाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. अधिकाऱ्यांनी महाविद्यालयांची केलेली 'गोपनीय' पाहणी आणि त्यांच्या अहवालाबाबत संशय व्यक्त केला जात असल्याने या महाविद्यालयांची त्रयस्थ अधिकाऱ्यांमार्फत पुन्हा पाहणी केली जाणार आहे. कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी पुरेशी जागा नसणे, बायोमेट्रिक हजेरी नसणे यांसारख्या त्रुटी ठेवून वर्ग सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिक्षण आयुक्तांनी या कनिष्ठ महाविद्यालयांच्या तपासणीचा आदेश दिला होता.**



उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि अन्य अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली. त्यात अनेक गैरप्रकार आढळले आहेत; परंतु अद्याप या शाळांना ना शिक्षणाधिकाऱ्यांनी कारवाई, ना आयुक्तांनी त्याची दखल घेतली आहे. एखाद्या सदनिकेमध्ये तीन हजार चौरस फूट जागेत कनिष्ठ महाविद्यालय चालविणे, विद्यार्थ्यांना बसायला पुरेशी जागा नसणे, शैक्षणिक पायाभूत सुविधा नसणे, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी यंत्रणा नसणे, वर्गात विद्यार्थ्यांची उपस्थिती नसणे यांसारख्या अनेक बाबी या पाहणीत आढळल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले; पण त्याची दखल शिक्षणाधिकारी स्तरावरून घेतली जात नाही. अशा अधिकाऱ्यांवरही कारवाईचे सूतोवाच शिक्षण आयुक्तांनी केले आहे.

### अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस कारणीभूत ठरणाऱ्या या बाबी आहेत; पण या समस्यांबाबत कुणाची तक्रारी आली, तर कारवाई बघू, अशी भूमिका घेऊन शिक्षणाधिकारी हातावर हात ठेवून आहेत. शिक्षणाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी असलेले अधिकारीच या प्रकारांकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्यांच्याविषयी देखील संशयाची भावना शिक्षण खात्यात आहे.

### पुन्हा तपासणी करणार : सोळंकी

शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली असता ते म्हणाले, ''कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी झाली असली, तरी त्याची पुन्हा तपासणीची गरज आहे. त्यासाठी बाहेरगावातील अधिकाऱ्यांमार्फत ही तपासणी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यातून तेथील नेमकी स्थिती समोर येईल. यासंबंधी प्रधान सचिवांबरोबर चर्चा झाली आहे. प्रत्यक्ष कार्यवाही लवकर होईल.''

Pune, Pune-Today
18/03/2020 Page No. 6

लोकमत

# कॉलेजच्या परीक्षा पुढे ढकलल्या

## कोरोनापासून बचाव : एसपी, एफसी व मॉडर्नचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळा व विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यात पुण्यातील स्वायत्त महाविद्यालयांनीसुद्धा आपल्या परीक्षा पुढे ढकलल्या असून, सुधारित वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाईल, असे संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कळविले आहेत. त्यामुळे येत्या ३१ मार्चनंतरच सर्व महाविद्यालयांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी राज्य शासनाने शाळा व विद्यापीठ स्तरावरील परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे घेतल्या जातात. मात्र, स्वायत्त महाविद्यालयाकडून स्वत: परीक्षांचे आयोजन केले जाते. फर्ग्युसन महाविद्यालय, स. प. महाविद्यालय व मॉडर्न महाविद्यालय या स्वायत्त महाविद्यालयांनी मार्च महिन्यात काही विषयांच्या परीक्षांचे नियोजन केले होते. परंतु, त्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्रसिंह परदेशी म्हणाले, महाविद्यालयाने स्वायत्त अभ्यासक्रमाच्या १६ ते ३१ जानेवारीपर्यंतच्या प्रात्यक्षिक परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा १ एप्रिलपासून सुरु होणाऱ्या लेखी परीक्षांनंतर होणार आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या आदेशानुसार परीक्षांचे नियोजन केले जाणार आहे.

### लवकरच सुधारित वेळापत्रक देणार

- स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप शेठ म्हणाले, शासन आदेशानुसार महाविद्यालयातर्फे येत्या ३१ मार्चपर्यंतच्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. महाविद्यालयातर्फे लवकरच सुधारित वेळापत्रक प्रसिध्द केले जाईल.तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार पुढील निर्णय घेतला जाईल.
- मॉर्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, महाविद्यालयाने १६ मार्च रोजी सर्व विद्यार्थ्यांना एसएमएस पाठवून परीक्षा पुढे ढकलण्याबाबत कळविले आहे. सुधारित वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाणार असून, विद्यापीठाच्या परीक्षांबरोबरच स्वायत्त अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन आहे.

Hello Pune
Page No. 3 Mar 19, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

### स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापना शुल्कात वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**राज्य शासनाचा निर्णय**

**पुणे** : स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठाची स्थापना करण्यासाठीच्या शुल्कात राज्य शासनाने वाढ केली आहे. प्रायोजक मंडळाकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे संस्करण शुल्क म्हणून आता १ कोटी रुपये शुल्क भरावे लागणार आहे. तसेच विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर अधिनियमात बदल करण्यासाठी ५० लाख रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

राज्य शासनाचे कार्यासन अधिकारी समीर ढेरे यांनी या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी प्रायोजक मंडळाकडून संस्करण शुल्कापोटी २५ लाख रुपये, तर अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ देण्यासाठी १२.५० लाख रुपये शुल्क आकारले जात होते. मात्र, आता या शुल्करचनेत बदल करण्यात आला आहे. नव्या नियमानुसार स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठाच्या स्थापनेचे संस्करण शुल्क म्हणून १ कोटी रुपये, तर प्रायोजक मंडळ विहित कालावधीत पूर्तता पत्र सादर करण्यास सक्षम नसल्यास त्या पुढील कालावधीसाठी दर वर्षी ५० लाख रुपये आकारले जातील.

शासनाच्या मान्यतेनंतर स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठाचा अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर त्यात बदल, सुधारणा किंवा दुरुस्ती करायची झाल्यास किती शुल्क आकारावे याची काहीच तरतूद नव्हती. मात्र, आता त्यासाठी ५० लाख रुपये आकारले जाणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 19 March 2020
https://epaper.loksatta.com/c/50121765

लोकमत

### विद्यापीठाने शुल्कवाढ मागे घ्यावी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विविध विभागांमधील व संलग्न महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांच्या शुल्कात केलेली वाढ अन्यायकारक आहे. आर्थिक मंदीच्या काळात विद्यार्थ्यांना वाढीव शुल्क भरणे शक्य होणार नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने शुल्कवाढीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी जनता दल (सेक्युलर) विद्यार्थी संघटनेतर्फे केली आहे.

विविध अभ्यासक्रमांच्या शुल्कात १० ते २० टक्के शुल्कवाढीचा निर्णय घेतला आहे. अनावश्यक गोष्टींवर खर्च केला जातो. विद्यापीठाने अनावश्यक खर्च कमी करून पालक व विद्यार्थी यांच्यावर लादलेला शुल्कवाढीचा निर्णय मागे घ्यावा, असे निवेदन जनता दल विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संग्राम शेवाळे यांनी दिले.

Hello Pune
Page No. 8 Mar 19, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

# विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी विद्यापीठाकडून ‘ई कंटेन्ट’ संकेतस्थळ

लोकसत्ता प्रतिनिधी

## एक हजाराहून अधिक शैक्षणिक चित्रफिती, ई साहित्य उपलब्ध

**पुणे :** करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना घरबसल्या अभ्यास करण्याची सुविधा प्राप्त झाली आहे. विद्यापीठातर्फे ‘ई-कंटेन्ट’ संकेतस्थळ सुरू केले असून, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची व्याख्याने, एक हजारहून अधिक चित्रफिती आणि अन्य शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच व्हॉट्सअ‍ॅप, ई-मेल, गुगल क्लासरूम आदी ई माध्यमांचा वापर करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची सूचना विद्यापीठाकडून करण्यात आली आहे.

करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी शासनाने विद्यापीठे बंद ठेवण्याचे आणि परीक्षा पुढे ढकलण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेऊन विद्यापीठाने संकेतस्थळावर स्वतंत्र वेब लिंक सुरू केली आहे. त्यावर विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे ई साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच



आणखी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे सुटीच्या काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान कमी करून शैक्षणिक कामकाजाशी जोडून ठेवणे शक्य होईल.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले की, करोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी देण्यात आलेल्या या सुटीच्या काळात शिक्षकांनी घरून काम (वर्क फ्रॉम होम) करणे अपेक्षित आहे. त्यांनी व्हॉट्सअ‍ॅप, ई-मेल, स्लाईड शेअर, गुगल क्लासरूम अशी माध्यमे वापरून विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती पोहोचवून मार्गदर्शन केले पाहिजे. त्यासाठीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या आवारात राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत (रुसा) ‘ई-कंटेन्ट’ विकसित करण्यासाठी अद्ययावत स्टुडिओची सुविधा देण्यात आली आहे. त्याचा वापर करून ई साहित्य निर्मिती करता येऊ शकते.

### गेल्या दहा वर्षांपासून ई साहित्य निर्मिती

विद्यापीठात ‘एज्युकेशनल मल्टिमीडिया रीसर्च सेंटर’च्या (ईएमएमआरसी) माध्यमातून गेल्या दहा वर्षांपासून ई साहित्य निर्माण केले जात आहे. यूसीजीअंतर्गत असलेल्या ‘कन्सोर्शियम फॉर एज्युकेशनल कम्युनिकेशन’ (सीईसी) या विभागाच्या सहकार्याने हे काम केले जात होते. आता ‘करोना’मुळे देण्यात आलेल्या सुटीचा वापर करण्यासाठी सीईसीच्या परवानगीने शैक्षणिक साहित्य विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे. विद्यापीठातील ‘ईएमएमआरसी’कडे देशभरातील सर्व २७ केंद्रांवरील ८७ विषयांशी संबंधित शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे.

### अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही लाभ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या या ई साहित्याचा उपयोग अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांनाही घेता येईल. राज्यातील आणि देशातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी त्यांना ही सुविधा मिळणे आवश्यक आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विकसित केलेल्या शैक्षणिक साहित्याचा अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. करमळकर यांनी केले.

Http://econtent.unipune.ac.in:8080/jspui या संकेतस्थळावर ई साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 20 March 2020
https://epaper.loksatta.com/c/50147598

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

लोकमत

# विद्यार्थ्यांना 'ई-कंटेन्ट'च्या माध्यमातून मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना सुटी देण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांचे शिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या संकेतस्थळाच्या होम पेजवर स्वतंत्र वेब-लिंक सुरु केली असून, त्यावर विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे ई-कंटेन्ट उपलब्ध करून दिले आहे. तसेच शिक्षकांनाही त्यांच्या विषयाची लेक्चर्स, नोटस, प्रेझेंटेशन, व्हिडिओ किंवा तत्सम ई-कंटेन्ट उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी दिल्या आहेत.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'एज्युकेशनल मल्टिमीडिया रीसर्च सेंटर'च्या (ईएमएमआरसी) माध्यमातून ई-कंटेन्टची निर्मिती सुमारे दहा वर्षांपासून होत आहे. यूसीजीअंतर्गत असलेल्या 'कन्सोर्शियम फॉर एज्युकेशनल कम्युनिकेशन' (सीईसी) विभागाच्या सहकार्याने हे तयार केले. हे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना ई-प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आले होते. आता सीईसीच्या परवानगीने हे शैक्षणिक साहित्य विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळावर सर्व विद्यार्थ्यांसाठी ठेवले आहे.

कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली तरी, त्यांचे शैक्षणिक नुकसान कमी करण्याकरिता विद्यापीठाने त्यांना घरुन अभ्यास करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, असे नमूद करून डॉ. करमळकर म्हणाले, विद्यापीठातर्फे 'ई-कंटेन्ट पोर्टल' सुरु करण्यात आले आहे. त्यात लेक्चर्स, पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन त्याचप्रमाणे १ हजाराहून जास्त व्हिडिओ ठेवण्यात आले आहेत. त्यात दिवसेंदिवस भर टाकली जात असून, अधिकाधिक शैक्षणिक साहित्य अपलोड करण्याचे काम सुरुच राहणार आहे. त्यामुळे सुटीच्या काळातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान कमी करणे शक्य होईल.

शिक्षकांनी घरुन काम (वर्क फ्रॉम होम) करणे अपेक्षित आहे. त्यांनी व्हॉट्सअॅप, ईमेल, स्लाइड शेअर, गुगल क्लासरुम अशी माध्यमे वापरून विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती पोहोचवावी आणि त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे. तसेच विद्यापीठ आवारात राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत (रुसा) 'ई-कंटेन्ट' निर्माण करण्यासाठी अद्ययावत स्टुडिओची सुविधा उभारण्यात आली आहे. त्याचा उपयोग करुनही शिक्षण ई-कंटेन्ट तयार करु शकतात, असेही करमळकर यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 8 Mar 20, 2020
Powered by: erelego.com

करोनाच्या पार्श्वभूमीवर सुविधा : विद्यार्थ्यांना आता घरूनही अभ्यास करता येणार

# पुणे विद्यापीठाचे 'ई-कंटेन्ट पोर्टल' सुरू

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १९ - करोना विषाणूचा संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक नुकसान कमी करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना घरून अभ्यास करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी विद्यापीठाने 'ई-कंटेन्ट पोर्टल' सुरू केले आहे. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची लेक्चर्स, नोट्स, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तसेच, १ हजारावर जास्त व्हिडिओ ठेवण्यात आले आहेत. त्यात दिवसेंदिवस भर टाकली जात आहे. त्याचबरोबर शिक्षकांनाही, व्हाट्सअप, ई-मेल, गुगल क्लासरूम व इतर ई-माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोष्टी उपलब्ध करून द्याव्यात व त्यांना मार्गदर्शन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांनी याबाबत विद्यापीठातील विविध विभागांचे शिक्षक तसेच, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व संस्था यांच्या शिक्षकांसाठी आदेश काढले आहेत. याबाबत कुलगुरू म्हणाले, 'करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी विद्यार्थ्यांना सुटी देण्यात आल्या आहेत. मात्र, त्यांचे शिक्षणही तितकेच महत्वाचे आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या वेबसाइटच्या होम पेजवर स्वतंत्र वेब-लिंक सुरू करण्यात आली आहे. त्यावर विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे 'ई- कंटेन्ट' उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय शिक्षकांनाही त्यांच्या विषयाची लेक्चर्स, नोट्स, प्रेझेंटेशन, व्हिडिओ किंवा तत्सम ई-कंटेन्ट उपलब्ध करून देण्याबाबत सांगण्यात आले आहे. अधिकाधिक साहित्य अपलोड करण्याचे काम सुरूच राहणार आहे. यामुळे सुट्टीच्या काळातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान कमी करणे शक्य होईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गोष्टींशी जोडून ठेवता येईल.

या काळात शिक्षकांनी घरून काम (वर्क फ्रॉम होम) करणे अपेक्षित आहे.

त्यांनी व्हॉट्सअॅप, ईमेल, स्लाईड शेअर, गुगल क्लासरूम अशी माध्यमे वापरून विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती पोहोचवावी आणि आवश्यक ते मार्गदर्शन करावे, असे सांगण्यात आले आहे.




**'ई-कंटेन्ट पोर्टल' लिंक**
http://econtent.unipune.ac.in:8080/jspui

### उत्तम प्रतिसाद व भरपूर ई-कंटेन्ट

कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांनी केलेल्या आवाहनाला विद्यापीठातील सर्व विभाग, त्यातील शिक्षक तसेच, महाविद्यालयांमधील शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे चारही विद्याशाखांमधील सर्वच विषयांचे शैक्षणिक ई-कंटेन्ट मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे. त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

### ई-कंटेन्टची निर्मिती दहा वर्षांपासून

पुणे विद्यापीठात 'एज्युकेशनल मल्टिमीडिया रीसर्च सेंटर'च्या (ईएमएमआरसी) माध्यमातून ई-कंटेन्टची निर्मिती सुमारे दहा वर्षांपासून होत आहे. हे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना ई-प्लॅटफॉर्मवर उपलब्धही करून देण्यात येत होते. आता करोना विषाणू संसर्गाच्या निमित्ताने ते विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे. विद्यापीठातील 'ईएमएमआरसी'कडे देशभरातील सर्व २७ केंद्रांवरील शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे. ते तब्बल ८७ विषयांशी संबंधित आहे. हे साहित्य आता विद्यापीठाच्या वेबसाईटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.

### इतर विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा- कुलगुरू

पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या या ई-कंटेन्टचा सर्व विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांनी केले आहे. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील तसेच, देशातील सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक ई-कंटेन्ट पोहोचवणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाने निर्माण केलेले शैक्षणिक साहित्य आमच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांबरोबरच इतरांनाही उपयोगी ठरेल. त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, असेही प्रा. करमळकर यांनी सांगितले.

प्रभात Fri, 20 March 2020
epaper.eprabhat.net/c/50143843

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

hindustantimes

# Virtual classrooms, e-portals have edu defying shutdowns

**FOR THE WIN** SPPU, other colleges have gone the tech-way to make sure students still get to learn

Dheeraj Bengrut
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** One thing that the Covid-19 (coronavirus) could not shut down, is the constant flow of education. Despite educational institutes being closed in Maharashtra, it has not stopped students from learning and faculty from teaching- all thanks to virtual classrooms and online e-content portals.

Savitribai Phule Pune University (SPPU) and several other colleges in the city have gone the tech-way to make sure that imparting of education is not hampered.

SPPU on Thursday started an online e-content portal which has more than 1,000 online educational videos, faculty lectures and powerpoint presentations (PPTs) for students.

"All the students of SPPU in city and across the state have been granted leave as a precautionary measure to combat the spread of coronavirus. At the same time their education is important and hence, we have decided to start the online e-content portal by SPPU. A separate link of the portal has been provided on the SPPU website on which various undergraduate and postgraduate e-study content has been uploaded. We are working to uploading more e-content for which faculty of all the departments are working from home. We appeal to all students other than SPPU also to take advantage of this portal for their studies," said SPPU vice-chancellor Nitin Karmalkar.

Similarly, St Mira's College for Girls has also started online virtual classroom lectures for their students.

Most teachers across all streams of undergraduate courses like BCom, BA, BBA, BSc (Computer Science), BCA and postgraduate courses like MA and MCom are using virtual teaching platforms.




St Mira's College for Girls has also started online virtual classroom lectures for their students. HT PHOTO

> A separate link of the portal has been provided on the SPPU website on which various undergraduate and postgraduate e-study content has been uploaded.
>
> NITIN KARMALKAR, V-C, SPPU

> The faculty has self-created e-learning content in the form of videos showing problem solutions, PowerPoint presentations, shared links for distance learning.
>
> GH GIDWANI, principal, St Mira's

**SPPU E-PORTAL LINK**

- SPPU e-content portal link - http://econtent.unipune.ac.in:8080/jspui.

"In the times of social quarantine, we are happy to continue our teaching endeavours at St Mira's College. The faculty has self-created e-learning content in the form of videos showing problem solutions, PowerPoint presentations, shared links to support distance learning. The integration of Moodle Platform, Whatsapp and email facilities is helping the faculty to manage the curriculum delivery and testing for learning assessment. The instantaneous response was received in the form of solved problems shared by students posted on Whats app groups for assessment," said college principal GH Gidwani.

# With final exams cancelled, yearly performance helps students pass

HT Correspondent
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** With schools being closed down due to the Covid-19 (coronavirus) outbreak, the question of promoting students to the next class cropped up as the final exams for all classes stand cancelled.

Some city schools on Thursday decided to promote students to the next class after the state education department ordered the schools to take a call on the issue.

In a circular issued by the St Mary's School, Pune principal Sujata Mallic Kumar stated, "Keeping in mind the current situation, we would like to inform you that the final examinations for this academic year, for Classes 1 to 7 stand cancelled. All students have been promoted to the next class. Report cards will be distributed to the students at the beginning of the next academic year, in June 2020. The ICSE (Indian Certificate of Secondary Education) and ISC Examinations 2020, have been postponed. The revised dates for conduct of the remaining papers shall be notified by the Council in due course of time."

Similarly, Dr Kalmadi Shamrao High School (Secondary School) sent a notification to the parents stating, "It has been decided that the students of Class 5-7 will not write the final exams this year. The students will be promoted to the next class on the basis of their average performance throughout the year. Based on the directives of the government, the school will remain closed till March 31.

"Right now, we cannot predict whether the regular lectures for students of Class 9 and Class 10 will begin in April or not."

State education commissioner Vishal Solanki said, "Looking at the current situation of the coronavirus outbreak across the globe, schools in our state have been closed down. So, we have instructed the school managements to take the decision on their own about promoting students to the next class at their level."

Hindustan Times 20-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

लोकमत

# विद्यापीठ परीक्षा रद्द करता येणार नाही

## शिक्षणतज्ज्ञांचे मत; पुढील शैक्षणिक वर्ष उशिरा सुरु होऊ शकते

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येत्या ३१ मार्चपर्यंतच्या विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मात्र, रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होत राहिली तर परीक्षा आणखी काही दिवस पुढे जाऊ शकतात. परंतु, विद्यापीठाने कोणत्याही परीक्षा रद्द करु नये; आवश्यकता भासल्यास पुढील शैक्षणिक वर्ष थोडे उशिरा सुरु करावे, असे मत शिक्षणतज्ज्ञांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले.

जगभरात कोरोनाने थैमान घातले असून भारतासह महाराष्ट्रातही कोरोनाने शिरकाव केला आहे. त्यात मुंबईपाठोपाठ पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून राज्य शासनाने शाळा, महाविद्यालयांना सुटी दिली आहे. त्याचप्रमाणे इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

सीबीएसईच्या परीक्षांसह राज्य मंडळाचा इयत्ता दहावीचा भूगोल विषयाची परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका आगीत जळून खाक झाल्या होत्या. त्यामुळे ही मानवनिर्मित आपत्ती असल्याचे गृहित धरुन सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कोरोना नैसर्गिक आपत्ती असल्याने विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनासुद्धा सरसकट उत्तीर्ण करता येईल का? अशी चर्चा शिक्षण वर्तुळात केली जात आहे. मात्र, परीक्षा न घेता उत्तीर्ण करणे योग्य नाही, असे मत शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

### परिस्थिती सुधारल्यावर परीक्षा घ्याव्यात

"कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा येत्या १ एप्रिलपासून नियमितपणे सुरु होण्याची शक्यता आहे. मात्र, रुग्णांच्या संख्येत वाढ होत राहिली तर आणखी काही दिवस परीक्षा पुढे जातील. परिणामी परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्यास विलंब होणार आहे. त्यातच क्रेडिट सिस्टीमचा स्वीकार केल्यामुळे पुढील शैक्षणिक वर्ष विस्कळीत होईल. परंतु, परिस्थितीत सुधारणा झाल्यावर विद्यापीठाने परीक्षा घ्याव्यात. पदवी व त्यानंतरच्या परीक्षांवर विद्यार्थ्यांचे करिअर आणि त्यांना मिळणारी नोकरी अवलंबून असते. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा रद्द करु नये.

- **प्रा. नंदकुमार निकम,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

### संबंधित घटकांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा

"कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करुन शिक्षणक्षेत्रासह सर्वच क्षेत्रांना यापुढील काळात उपाययोजना कराव्या लागतील. शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द झाल्या असल्या तरी पदवीस्तरापासून पुढील परीक्षा रद्द करणे योग्य होणार नाही. मात्र, विद्यापीठ प्रशासनाने परीक्षेबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व जिल्ह्यातील ज्येष्ठ प्राध्यापकांना व शिक्षण संस्थाचालकांना विश्वासात घेतले पाहिजे. तसेच गर्दी होणार नाही, याबाबत दक्षता घेऊन तोंडी किंवा लेखी परीक्षेबाबत निर्णय घ्यावा.

- **डॉ. अरुण अडसूळ,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

Hello Pune
Page No. 7 Mar 23, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

# शिक्षण ऑनलाइन

Niraj.Pandit
@timesgroup.com
Tweet : @nirajcpanditMT



**करोना विषाणूमुळे शाळा, कॉलेजांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मात्र, यामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होईल का? स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर काय परिणाम होईल? असे अनेक प्रश्न काही पालकांना पडलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय खुला असणार आहे. पाहू या शाळा आणि कॉलेज स्तरावरील शिक्षण देणारे काही ऑनलाइन पर्याय...**

### स्टेपॲप

एखादी वैज्ञानिक संकल्पना आपल्याला शिकायची असेल तर ती वाचून शिकण्या ऐवजी प्रयोगातून चांगली लक्षात राहते. असंच इतिहास, भूगोल, भाषा सर्वच विषयांचं आहे. यामुळेच जगभरात कृतिशील शिक्षणाची मूहर्तमेढ रोवली गेली. जी आपल्या देशातही आता राबवण्यात येऊ लागली आहे. मात्र ही शिक्षणपद्धतील तळागाळातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल असं नाही. नेमकं हेच ओळखून आयआयटीचे माजी विद्यार्थी व प्राध्यापक प्रविण त्यागी यांनी खेळा आणि शिका या संकल्पनेवार आधारित स्टेपॲप नावाच्या ॲपची निर्मिती केली. यात सीबीएसईपासून ते राज्य शिक्षण मंडळाच्या पाचवी ते बारावीचा अभ्यासक्रम उपलब्ध

STEPapp
SCHOOL EDUCATION GAMIFIED

करून देण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम ऑनलाइन शिकता येणार आहे. यात प्रत्येक संकल्पनेवर गेम्सच्या माध्यमातून सखोल विवेचन करण्यात आलं आहे. इतकेच नव्हे तर ही संकल्पना विद्यार्थ्याला समजली आहे की नाही हे पाहण्यासाठी प्रत्येक संकल्पनेवर प्रश्न मंजुषाही देण्यात आली आहे. जर यात विद्यार्थी चुकला तर त्याला पुन्हा ती संकल्पना समजावून सांगितली जाते. या ॲपच्या माध्यमातून आपला पाल्य काय करत आहे त्याची प्रगती किती झाली याचा रिअल टाइम डेटा पालकांपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. विविध राज्य सरकार या ॲपचा वापर त्यांच्या शाळेत करण्याच्या दृष्टीनं प्रयत्नशील आहेत. यात महाराष्ट्र सरकारचाही समावेश आहे. अगदी अल्पदरात ही शिक्षण पद्धती उपलब्ध करून देण्यात आलेल्या या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक कोटी ते ५० कोटी रुपयांची शिष्यवृत्तीही मिळवण्याची संधी आहे. सध्या हे ॲप इंग्रजीत उपलब्ध असलं तरीही लवकरच मराठी व हिंदीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### ऑनलाइन शाळा

LEAD SCHOOL

करोना व्हायरसमुळे देशातील बहुतांश राज्यांमध्ये शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात केंद्रीय विद्यालयांचाही समावेश आहे. तर काही खासगी शाळांचाही समावेश आहे. अशावेळी तंत्रज्ञानाचा वापर करून देशातील सुमारे ८०० शाळा सुरू राहू शकणार आहेत. 'लीड स्कूल@होम' या उपक्रमाअंतर्गत वर्गातील सर्व विद्यार्थी शिक्षकांशी ऑनलाइन पद्धतीनं जोडले जाऊ शकतात आणि त्यांचा नियमित वर्ग सुरू राहू शकतो. अशा पद्धतीचं तंत्रस्नेही शिक्षण 'LEAD स्कूल'नं उपलब्ध करून दिलं आहे. यात पुस्तकविरहित शाळा ही संकल्पना मांडण्यात आली आहे. यात शाळा ऑनलाइन भरून मुलांनी आज कोणता गृहपाठ करायचा आहे याचा तपशीलही पालकांना ॲपच्या माध्यमातून समजू शकणार आहे. तसंच वर्गात मुलांनी कोणता अभ्यास केला ते आपल्या मुलाला किती समजलं याचा तपशीलही पालकांना मिळू शकणार आहे.

### शंकांचं समाधान

अभ्यास करताना येणाऱ्या विविध शंकांचं समाधान करण्यासाठी तुम्ही शिक्षकांची मदत घेतात. मात्र आता जर सुट्टी लागली आहे आणि तुम्हाला शिक्षकांना भेटता येणार नाही अशावेळी तुम्ही डाऊटहंट या ॲपच्या माध्यमातून तुमच्या शंकांचं समाधान करू शकता. या ॲपवर नववी, दहावी, अकरावी, बारावी याचबरोबर आयआयटी जेईई मेन्स, ॲडव्हान्स, नीट अशा अभ्यासक्रमांचे




हजारो व्हिडीओज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना संकल्पना समजण्यास सोपं जातं. या ॲपवर किंवा वेबसाइटवर तुम्ही गेलात की तुम्ही तुम्हाला जो डाऊट आहे तो तिथे दिलेल्या बॉक्समध्ये लिहू शकता. याचबरोबर त्याचा वापर करून तुम्ही त्याची इमेजही अपलोड करू शकता. तो रिड करून तुम्हाला उत्तर दिलं जातं. हे उत्तर तुम्ही पीडीएफमध्ये डाऊनलोड करू शकता. यामुळे हे ॲप इतरांपेक्षा वेगळं ठरत आहे. विज्ञान विषयासाठी हे ॲप सर्वाधिक उपयुक्त असल्याचं तज्ज्ञ सांगतात.

### टेस्टबुक

सध्या शाळा-कॉलेजस बंद झाले असले तरीही हा हंगाम अनेक स्पर्धा परीक्षांचा विशेषतः सरकारी नोकरीत संधी असलेल्या स्पर्धा परीक्षांचा आहे. यामुळे हे क्लासेसही करोनामुळे बंद करण्यात आले आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी टेस्टबुक ही वेबसाइट नक्कीच उपयुक्त ठरू शकते. आशुतोष कुमार, मनोज मुन्ना, प्रवीण अग्रवाल आणि नरेंद अग्रवाल या आयआयटीच्या माजी विद्यार्थ्यांच्या टीमनं या वेबसाइटची निर्मिती केली. देशातील विविध राज्यांच्या सरकारी नोकरीतील संधीची केवळ माहिती तरुणांपर्यंत पोहोचवून उपयोग नाही तर ही नोकरी मिळवण्यासाठी नेमके काय

testbook.com

करावं, परीक्षेची तयारी कशी करावी याचं मार्गदर्शन मिळणंही आवश्यक आहे. यामुळे या तरुणांनी या वेबसाइटची सुरुवात केली. या वेबसाइटवर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विचारण्यात येणारे सुमारे तीन अब्जांहून अधिक प्रश्नांची बँक आहे. या साइटवर सध्या ४० लाख युजर्स उपलब्ध असून त्यापैकी चार लाख युजर्स हे राज्यातील आहेत. या वेबसाइटवर १५० हून अधिक सरकारी परीक्षांचे पर्याय उपलब्ध आहेत.

Times of India

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

लोकमत

### संशोधन, शोधनिबंध, प्रश्नांची बँक तयार करण्याच्या सूचना

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये येत्या ३१ मार्चपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या कालावधीत प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घरात थांबून संशोधनाचे काम सुरु ठेवावे, रिसर्च पेपर लिहावेत, विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण प्रश्नांची बँक तयार करुन ठेवावी. तसेच 'एक भारत श्रेष्ठ भारत'हा उपक्रम अधिक चांगल्या पद्धतीने कसा राबविता येईल; याबाबत विचार करावा, असे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे देण्यात आले आहेत.

जगभरात थैमान घालणाऱ्या कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'च्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे घरी बसून प्राध्यापकांनी ऑनलाईन माध्यमांचा अवलंब करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे परदेशी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या वसतिगृहांची मुदत वाढवावी. मात्र, या विद्यार्थ्यांना कोरोनाबाबत काळजी घेण्याच्या सूचना द्याव्यात.

Hello Pune
Page No. 3 Mar 24, 2020
Powered by: erelego.com

'स्टुडंट सेमिस्टर आऊटरीच'ला यूजीसीची तत्त्वतः मान्यता

### शिक्षण संस्थेबाहेर एक सत्र शिकण्याची विद्यार्थ्यांना संधी

चिन्मय पाटणकर, लोकसत्ता

पुणे : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा विषय घेऊन अभ्यासक्रमातील एक सत्र शिक्षण संस्थेबाहेर जाऊन शिकण्याची संधी मिळू शकणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) 'स्टुडंट सेमिस्टर आऊटरीच' या संकल्पनेला तत्त्वतः मान्यता मिळाली असून, येत्या काही काळात ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकेल.

परदेशातील अनेक विद्यापीठांमध्ये स्टडी ॲब्रॉड म्हणजे देशाबाहेर जाऊन शिकण्याची सुविधा विद्यार्थ्यांना दिली जाते. मात्र, भारतातील विद्यापीठांमध्ये अशी सुविधा नाही. विद्यार्थ्यांना त्यांचा छंद, आवडीचा प्रत्यक्ष शिक्षणातही उपयोग होत नाही. ही उणीव दूर करून शिक्षण व्यवस्थेत मोकळीक आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग 'स्टुडंट सेमिस्टर आऊटरीच' ही अभिनव योजना प्रत्यक्षात आणणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या संकल्पनेतून ही योजना साकारत आहे. त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा विषय घेऊन एक सत्र प्रत्यक्ष समाजात जाऊन शिकण्याची संधी मिळेल.

योजनेच्या संकल्पनेची माहिती देताना डॉ. पटवर्धन म्हणाले, की वर्गात मिळते तेच शिक्षण असा समज आपल्याकडे आहे. मात्र, वर्गातील औपचारिक शिक्षणापलीकडेही शिकण्यासारखे खूप काही असते. शिक्षणेतर उपक्रमही खूप महत्त्वाचे असतात. मात्र, सध्याच्या व्यवस्थेत त्यांना फार महत्त्व दिले जात नाही. विद्यार्थ्यांचे संगीत, चित्रकला छंद, विविध खेळ, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना अशा योजनांकडेही अभ्यासेतर उपक्रम म्हणूनच पाहिले जाते. या योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राशिवाय शैक्षणिक फायदा मिळत नाही. ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न 'स्टुडंट सेमिस्टर आऊटरीच'द्वारे केला जाणार आहे. ही योजना विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरूपाची असेल. या योजनेमध्ये एका सत्रासाठी श्रेयांक देऊन ते नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट रिपॉझिटरीअंतर्गत साठवले जाऊ शकतात. त्यामुळे बाहेर पूर्ण केलेल्या सत्राचा विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होऊ शकतो. या योजनेत विद्यार्थी शैक्षणिक संस्थेबाहेर जाऊन काम करू शकणार असले, तरी त्यांना एक प्राध्यापक **(पान २ वर)**

#### समाजात विद्यापीठ, विद्यापीठात समाज

आजच्या घडीला विद्यापीठे आणि समाज एकमेकांपासून दूर आहेत. या योजनेमुळे विद्यार्थी समाजात जाऊन काम करू शकणार असल्याने समाजात विद्यापीठ पोहोचू शकेल. तर विद्यार्थ्यांनी केलेल्या कामामुळे विद्यापीठात समाजाचे प्रतिबिंब उमटेल, असेही डॉ. पटवर्धन यांनी नमूद केले.

#### नव्या शिक्षण धोरणाच्या मान्यतेनंतर अंमलबजावणी

सध्या या योजनेचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करून नव्या शिक्षण धोरणाअंतर्गत ही योजना राबवली जाऊ शकेल, असे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Tue, 24 March 2020
https://epaper.loksatta.com/c/50278767

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

## शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २३ - शाळांमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घरातून काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

करोनाचा प्रभार रोखण्यासाठी शाळा व महाविद्यालये ३१ मार्चपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. शाळांमधील परीक्षाही रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. शासकीय, खासगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, विना अनुदानित, स्वयंअर्थसहायित शाळांमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घरातून कामे करण्याबाबत परवानगी देण्याविषयी शालेय शिक्षण विभागाने आदेश जारी केले आहेत.

पुणे जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनील कुऱ्हाडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. गणपत मोरे यांनी पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, नगरपालिका, नगर परिषदांचे प्रशासन अधिकारी यांना शाळांना योग्य त्या खबरदारीच्या सूचना देण्याबाबतचे आदेश लागू केले आहेत. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घरातून काम करण्यास शाळांनीही मान्यता देणे आवश्यक आहे.

काही शाळांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून आदेश आलेले असतानाही शाळांमध्ये कामकाजासाठी फोन करून, एसएमएस पाठवून बोलाविण्याचा धडाका लावला होता. त्यानंतर संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ही बाब विविध संघटनांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यावर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल करून घटनांची माहिती दिली. त्याची गांभीर्याने दखल घेत शिक्षणाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि.२३) इतर अधिकाऱ्यांना आदेश बजाविले आहेत.

प्रभात Tue, 24 March 2020 epaper.eprabhat.net/c/50280554

---

लोकमत

## उच्च शिक्षणाच्या ढवळाढवळीची राज्यपालांकडून गंभीर दखल

### मुख्यमंत्र्यांना लिहिले खरमरीत पत्र, कारवाई करण्याचे दिले निर्देश

विशेष प्रतिनिधी | लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याने खात्याकडून विद्यापीठांच्या आणि राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाच्या कारभारात ढवळाढवळ केली जात असल्याबद्दल कुलपती व राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अत्यंत तीव्र नाराजी व्यक्त केली असून तसे खरमरीत पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवले आहे. विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याच्या या प्रकाराची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, असे निर्देशही राज्यपालांनी दिले आहेत.

राज्यपालांकडून राज्य शासनाशी जो पत्रव्यवहार केला जातो तो सहसा माध्यमांसाठी खुला केला जात नाही. मात्र, सदर पत्र राजभवनकडून मंगळवारी प्रसिद्धीला देण्यात आले.

> रुसा आणि विद्यापीठांना त्यांच्याकडील शिल्लक रक्कम शासन खाती जमा करण्याचे जे आदेश दिलेले आहेत ते वित्त विभागाकडून आलेल्या लेखी सूचनेनुसार दिलेले आहेत. असे आदेश यापूर्वीही निघत आले आहेत. विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याचा त्यात कुठलाही हेतू नाही. माझ्या ओएसडीने विद्यापीठांमधील बांधकामासंदर्भात माहिती मागवली होती हे खरे आहे. कारण, विधान विधिमंडळात यासंदर्भातील प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी अशी माहिती आम्हाला तयार ठेवावी लागते.
>
> - उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या कार्यालयाने १३ मार्चला राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे (रुसा) प्रकल्प संचालक, सर्व कृषी विद्यापीठांचे कुलगुरु आणि राज्य उच्च शिक्षण संचालक पुणे यांना एक आदेशवजा पत्र पाठवले.

आपल्या बँक खात्यातील शिल्लक रक्कम आपण शासकीय शासन खाती जमा करावीत तसे न केल्यास २०२०-२१ या वषार्साठी आपल्याला अनुदान देण्यात येणार नाही, असे त्या आदेशात म्हटले होते.

राज्यपालांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने असाआदेश पहिल्यांदाच काढला आहे. हा आदेश म्हणजे विद्यापीठांच्या पवित्र स्वायत्ततेवर घाला घालण्याचा प्रकार आहे.

मुळात हा विषय मंत्र्यांच्या कार्यकक्षेत येत नाही. विभागाने केलेला हस्तक्षेप योग्य नाही आणि विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठांना देण्यात आलेल्या स्वायत्ततेचे ते उल्लंघन असल्याचे राज्यपालांनी म्हटले आहे.

Pune Main
Page No. 3 Mar 25, 2020
Powered by: erelego.com

---

## विद्यापीठाच्या पोर्टलवर ई-कंटेन्ट अपलोड करण्यासाठी १६ जणांना प्रशिक्षण

पुणे, दि. २५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ई-कंटेन्ट पोर्टलची निर्मिती केल्यानंतर आता त्यावर विविध विषयांचा ई-कंटेन्ट अपलोड करण्याबाबत १६ जणांना रविवारी प्रशिक्षण देण्यात आले आहे. या सर्व जणांनी सोमवारपासून (२३ मार्च) त्यांच्या त्यांच्या ठिकाणावरून हा कंटेन्ट पोर्टलवर अपलोड करणे सुरू केले आहे. त्याचबरोबर विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांच्या शिक्षकांनाही त्यांचे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे आवाहनही केले आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

प्रभात Thu, 26 March 2020 epaper.eprabhat.net/c/50339776

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

सकाळ

# शैक्षणिक वर्ष विस्कळित

## कोरोनामुळे परीक्षा, निकाल आणि प्रवेशाचा उडणार गोंधळ

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २५ : कोरोनामुळे देशभरात लॉकडाऊन घोषित झाल्याने राज्यातील सीईटी परीक्षा आणि विद्यापीठांच्या परीक्षा लांबणीवर गेल्या आहेत. यामुळे सीईटी परीक्षा, निकाल आणि नवीन वर्षाच्या प्रवेशाचा गोंधळ उडणार आहे. यामुळे २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष विस्कळित होणार आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे देशभरात १५ एप्रिलपर्यंत लॉकडाऊनची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. यामुळे सीईटी सेलने एमएचटी-सीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेला राज्यभरातून तब्बल पाच लाखांहून अधिक विद्यार्थी बसणार आहेत. ही परीक्षा लांबणीवर गेल्याने प्रथम वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वेळापत्रक कोलमडणार आहे. अभियांत्रिकी, कृषी, एमबीए, विधी अशा विविध अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा लांबणीवर जाणार असल्याने याचे निकाल आणि अभ्यासक्रमाची प्रवेश सुरू होण्यास मे जून महिना उजाडण्याची शक्यता आहे. यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू होण्यास जुलै महिना लागू शकतो. यामुळे या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष लांबणार आहे.

राज्य सरकारने शाळा-महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाठोपाठ राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ३१ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आता पुन्हा पंतप्रधानांनी १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊनची घोषणा केल्याने विद्यापीठाची परीक्षाही पुढे गेली आहे. कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात न आल्यास आणखी निर्बंध येऊ शकतात. यामुळे विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक तयार करत नाही. विद्यापीठाच्या परीक्षा सुमारे दोन महिने चालतात. परीक्षांनंतर निकाल जाहीर होण्यास दीड महिन्याचा कालावधी लागतो.



संग्रहित छायाचित्र

त्यामुळे यंदा विद्यापीठांच्या परीक्षा आणि निकालाचा मोठा गोंधळ उडणार आहे. याचा परिणाम प्रवेश प्रक्रियेवर होणार आहे. यातून आगामी शैक्षणिक वर्ष विस्कळित होण्याचा अंदाज शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे.

Pune, Main
26/03/2020 Page No. 5




Image Courtesy: Google Images

# News Paper Clippings During March 2020

## Section : Education

### विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ऑनलाईन अभ्यासासाठी पर्याय

# विषाणूला रोखण्यासाठी घरीच रहा... पण अभ्यासही करा!

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** संचारबंदीच्या काळात 'घरात राहा, पण अभ्यास सुरू ठेवा,' असे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाने केले आहे. आयोगाच्या दहा प्रणालींच्या माध्यमातून विद्यार्थी अभ्यास सुरू ठेवू शकतील. त्यासाठी स्वयम, मूक्स या प्रणाली आयोगाने सर्वांसाठी खुल्या केल्या आहेत.

महाविद्यालये, विद्यापीठे बंद असली तरीही आपला अभ्यास नियमित सुरू ठेवण्यासाठी अनेक पर्याय आयोगाने उपलब्ध करून दिले आहेत. काही महाविद्यालये ऑनलाईन तासिका घेत असली तरी जेथे ही सुविधा नाही, मात्र संगणक किंवा फोनवर इंटरनेट आहे अशा कोणत्याही भागांतील विद्यार्थी ऑनलाईन अभ्यास करू शकतील.

'स्वयम' ही ऑनलाईन शिक्षणाची सुविधा आयोगाने विकसित केली आहे. देशभरातील १३३ उच्च शिक्षणसंस्था या अभ्यासक्रमात सहभागी असून आतापर्यंत २ लाख ८४ हजार ७६६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तर २६३ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमही पूर्ण केला आहे. सध्या नोंदणी नसतानाही स्वयमचे अभ्याससाहित्य विद्यार्थी वापरू शकतील. ज्यांनी जानेवारीच्या सत्रासाठी नोंदणी केली आहे, त्यांनी नियमित अभ्यास सुरू ठेवायचा आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

या प्रणालीला पूरक असणारी अजून एक व्यवस्था म्हणजे 'मूक्स'. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे साहित्य मूक्सच्या माध्यमातून मिळू शकेल. 'ई-पीजी पाठशाळा' या प्रणालीवर समाजशास्त्र, कला, उपयोजित कला, मानवविद्या, गणित आणि विज्ञान या विद्याशाखांतील ७० हून अधिक विषयांचे अभ्यासक्रमांवर आधारित ई-साहित्य मिळेल. लेखी स्वरूपात किंवा ध्वनीचित्रफितींच्या स्वरूपातील २३ हजार संच उपलब्ध आहेत. याचप्रमाणे पदवी अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या प्रणालीमध्ये ८७ अभ्यासक्रमांचे २४ हजार ११० पाठ मिळतील.

'नॅशनल डिजिटल लायब्ररी'वर अनेक विषयांतील शैक्षणिक साहित्याचा संग्रह आहे. भारतीय भाषांमध्येही या प्रणालीमार्फत साहित्य मिळू शकते. शारीरिक व्याधी, अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या प्रणालीवर पर्याय उपलब्ध आहेत.

### अभ्यासक्रम वाहिन्या...

स्वयंप्रभा हा ३२ 'डीटीएच' वाहिन्यांचा समूह आहे. या सर्व वाहिन्या अभ्यासक्रमावर आधारित साहित्याची निर्मिती करत असून त्या मोफत उपलब्ध आहेत. पारंपरिक विद्याशाखांबरोबरच अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, विधि, वैद्यकीय, कृषी या विद्याशाखांतील व्याख्याने, साहित्य या वाहिन्यांवर प्रसारित होते. त्याचे प्रसारित झालेले भाग स्वयंप्रभाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याशिवाय आयोगाने अभ्यासक्रमावर आधारित यूट्यूब वाहिन्याही सुरू केल्या आहेत.

**संशोधनासाठीही मुबलक साहित्य :** शोधगंगा हा हा देशभरातील प्रबंध, शोधनिबंध यांचा संग्रह आहे. प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्याकडील पीएचडीचे प्रबंध आणि शोधनिबंध शोधगंगा या प्रणालीवर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. राज्यातील विद्यापीठे याबाबत उदासिन असली तरी आतापर्यंत देशभरातील २ लाख ६० हजार प्रबंध शोधगंगावर उपलब्ध झाले आहेत. 'ई शोध सिंधू' या संकेतस्थळावर मान्यताप्राप्त संशोधन नियतकालिकांचा साठा मिळू शकेल. जगभरातील साधरण १५०० कोटी नियतकालिके, शोधनिबंध, विशेषांक, माहितीसंग्रह, संदर्भ ग्रंथ या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगाने म्हटले आहे. 'विद्वान' या संकेतस्थळाच्या माध्यमातून विविध विषयांतील तज्ज्ञांची माहिती, संशोधनासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक स्रोतांची माहिती मिळू शकेल. सध्या या संकेतस्थळावर ४९ हजार तज्ज्ञांची आणि ५ हजार ७०० संस्थांची माहिती उपलब्ध आहे.

### संकेतस्थळे...

http://storage.googleapis.com/uniquecourses/online.html
http://ugcmoocs.inflibnet.ac.in
http://cec.nic.in
epgp.inflibnet.ac.in
www.swayamprabha.gov.in
www.youtube.com/user/cecedusat
ndl.iitkgp.ac.in
shodhganga.inflibnet.ac.in
ess.inflibnet.ac.in
vidwan.inflibnet.ac.in

epaper.loksatta.com
लोकसत्ता Thu, 26 March 2020
https://epaper.loksatta.com/c/50339248

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

# SPPU trains 16 librarians to upload study material online

TIMES NEWS NETWORK

File photo



The librarians started uploading the content remotely from Monday

**Pune:** After designing an e-content portal to help students to learn from home, the Savitribai Phule Pune University (SPPU) has now trained 16 college librarians to manage the study material.

All the librarians have started uploading the content remotely from Monday onto this portal. SPPU has also appealed to faculty from affiliated colleges to share their material, a statement said.

In the wake of the Covid-19 outbreak, all SPPU departments and colleges had shut last week. Teachers have been asked to work from home. In this backdrop, SPPU has created e-content portal (accessible on 'http://econtent.unipune.ac.in'). Videos, lectures, notes, assignments, and PowerPoint presentations have already been uploaded on the website.

The librarians were trained via a webinar on March 22. In addition, 19 coordinators have been appointed to upload content from different subjects. Their names, email addresses, contact numbers and subjects have been circulated among institutes.

लोकमत

# द्वितीय व तृतीय वर्षांच्या परीक्षांचे वेळापत्रक नव्याने तयार करणार

## कुलगुरु डॉ. नितीन करमळकर : प्रथम वर्षाच्या परीक्षेत शिथिलतेचा विचार

राहुल शिंदे।
लोकमत न्यूज नेटवर्क

> विद्यापीठातील व महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी विविध विषयांचे मार्गदर्शनपर व्हिडीओ तयार केले आहेत. सुमारे दीड हजार व्हिडीओ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाही, तर इतर विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा हे व्हिडीओ डाऊनलोड करुन घेतले आहेत. विद्यापीठाच्या प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांना इतरही शैक्षणिक साहित्य पुरविले जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याबाबत खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देताना अडचण येणार नाही.
>
> **- डॉ. नितीन करमळकर,**
> कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेत शिथिलता आणण्याचा विचार विद्यापीठातर्फे केला जात आहे. मात्र, द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे, असे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करुन विद्यापीठांना व महाविद्यालयांना सुटी देण्यात आली. तसेच विद्यापीठांच्या ३१ मार्चपर्यंतच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आता या परीक्षा १४ एप्रिलपर्यंत पुढे ढकलाव्या लागणार आहेत. विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रमासाठी क्रेडिट सिस्टीम लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सध्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन केले जात आहे. या अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत शिथिलता देता येईल का? याबाबत विद्यापीठ स्तरावर विचार केला जात आहे.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, ''कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी केंद्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे येत्या १४ एप्रिलपर्यंत विद्यापीठ स्तरावरील परीक्षा घेणे शक्य नाही. परिणामी विद्यापीठाला सर्व परीक्षांचे वेळापत्रक नव्याने तयार करावे लागणार आहे. परीक्षा घेणे, निकाल जाहीर करणे आणि पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देणे, याबाबतचे वेळापत्रक आता विस्कळीत होणार आहे. त्यामुळे द्वितीय व तृतीय वर्षांच्या परीक्षा घेऊन प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत रिलॅक्सेशन देता येईल का? याबाबत विचार केला जात आहे.''

Pune Main
Page No. 2 Mar 26, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : EDUCATION

## प्राध्यापकांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये कार्यरत प्राध्यापकांकडून करोना विषाणू विरोधातील लढाईसाठी एक दिवसाचे वेतन दिले जाणार आहे. राज्यातील प्राध्यापकांच्या महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशनने (एमफुक्टो) या संघटनेने हा निर्णय परिपत्रकाद्वारे जाहीर केला आहे.

राज्य शासनाच्या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी एमफुक्टो या प्राध्यापकांच्या संघटनेनेही पुढाकार घेतला आहे. एमफुक्टोचे अध्यक्ष डॉ. तपती मुखोपाध्याय आणि सरचिटणीस डॉ. एस. पी. लवांडे यांनी या बाबतचे निवेदन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिले आहे. ११ अकृषी विद्यापीठांमध्ये संघटनेचे सदस्य असलेले सुमारे ३० हजार प्राध्यापक कार्यरत आहेत. प्राध्यापकांना एप्रिलमध्ये दिल्या जाणाऱ्या वेतनातून शासनाने एक दिवसाचे वेतन घ्यावे, असे संघटनेचे पत्रात नमूद केले आहे.

डॉक्टर, परिचारिका यांच्या अभिमानास्पद कामगिरीसाठी संघटनेने त्यांचे आभारही मानले आहेत.

### रयत शिक्षण संस्थेकडून दोन कोटींचा निधी

रयत शिक्षण संस्थेकडून दोन कोटींचा निधी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिला जाणार असल्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केली आहे. संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन एकत्रित करून सुमारे दोन कोटींचा निधी धनादेशाद्वारे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## 'एक दिवसाचे वेतन पंतप्रधान निधीसाठी द्यावे'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** देशातील विद्यापीठांतील प्राध्यापक, कुलगुरू आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे एक दिवसाचे वेतन पंतप्रधान राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीमध्ये जमा करण्याचे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केले आहे.

जगभरातील अनेक देशांसह भारतात करोना बाधितांची संख्या वाढत आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांची जबाबदारी वाढली आहे. शैक्षणिक संस्थांनी करोना संसर्गासंदर्भात केवळ नागरिकांचे प्रबोधन न करता आर्थिकदृष्ट्या हातभार लावण्याची गरज आहे. करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी शिक्षण संस्थांचे संचालक, कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या आव्हानात्मक परिस्थितीत पुढे येऊन सरकारला एक दिवसाचे वेतन आर्थिक मदत म्हणून द्यावे, असे आवाहन यूजीसीचे अध्यक्ष डी. पी. सिंह यांनी केले आहे.

लोकसत्ता Tue, 31 March 2020 https://epaper.loksatta.com/c/50526493



## विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांच्या सुट्या वाढवल्या

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३० -** केंद्र शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या दि. १ एप्रिल ते १४ एप्रिलपर्यंत विद्यापीठाला व संलग्न महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली असल्याचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घरातून कामे करावीत, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी स्पष्ट केले आहे. तर, विद्यार्थ्यांनी ई-लर्निंग यंत्रणेद्वारे अभ्यास करण्याचेही आदेशीत करण्यात आले आहे.

प्रभात Tue, 31 epaper.e

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : WORK OF APPRECIATION

**नवभारत**

# शहर में ई-वाहनों का करें इस्तेमाल

## महिला एवं बाल कल्याण समिति अध्यक्ष की मनपा आयुक्त से मांग

संवाददाता

**पुणे.** शहर में यातायात की समस्या बढ़ती जा रही है. साथ ही प्रदूषण में भी बढ़ोत्तरी हो रही है. इस वजह से आगामी काल में शहर की प्रमुख सड़कों पर छोटे ई-वाहनों का इस्तेमाल किया जाए. इससे प्रदूषण की समस्या खत्म होने के साथ ही यातायात सुचारू होगी. ऐसी मांग महिला एवं बाल कल्याण समिति की अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे ने की है. इससे संबंधित एक पत्र भी उन्होंने मनपा आयुक्त को दिया है.



### प्रदूषण वृद्धि पर लग सकेगी लगाम

महापालिका आयुक्त को दिए गए पत्र के अनुसार शहर में यातायात की समस्या चरम पर है. इससे प्रदूषण में वृद्धि हो रही है. नतीजा नागरिकों को स्वास्थ्य से संबंधित बीमारियां हो रही है. हाल ही में दिल्ली में भी ऐसा ही माहौल हुआ था. इस वजह से अब इससे पाठ सिखकर हमें ई-वाहनों को बढ़ावा देना चाहिए. हाल ही में वाहन निर्माण करनेवाली कंपनियों पर सरकार ने प्रदूषण कम करने संबंधित नियम लगाए थे. उसे उनका अच्छा प्रतिसाद मिला है. इसके अनुसार प्रदूषणविरहित इ-वाहन अब बाजार में आए है. उनके इस्तेमाल शहर के सड़कों पर होना चाहिए.

### रोजगार को भी मिलेगा प्रोत्साहन

पत्र में आगे कहा गया है कि शहर में प्रमुख सड़कें यानी एफसी रोड, जेएम रोड, तिलक रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड, कुमठेकर रोड, विद्यापीठ रोड का समावेश है. ऐसी सड़कों पर अगर छोटे ई-वाहन चलाए जाएंगे तो नागरिकों को भी आसानी होगी. साथ ही प्रदूषण में कमी होगी. नतीजा रोजगार को भी प्रोत्साहन मिलेगा. इस वजह से आयुक्त इस पर अमल करें. ऐसी मांग उन्होंने पत्र में की है.

Navabharat Pune Edition
4 Mar, 2020 Page No. 3

# News Paper Clippings During March 2020

## Section : Work of Appreciation

» अवतीभवती — सकाळ.

### वर्दळीच्या रस्त्यांवर महापालिकेने ई-व्हेइकलचा वापर करावा : एकबोटे

**पुणे** : शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर महापालिकेने छोट्या स्वरूपातील ई-व्हेइकलचा वापर करावा, अशी मागणी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त शेखर गायकवाड यांच्याकडे मंगळवारी केली. पुणे विद्यापीठ रस्ता, जंगली महाराज रस्ता, लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, टिळक रोड, कुमठेकर रोड, शिवाजी रोड, या प्रमुख रस्त्यांवर महापालिकेच्या वतीने छोट्या स्वरूपातील ई-व्हेइकलचा वापर करण्यात यावा, त्याचा फायदा नागरिकांना होईल; त्याचप्रमाणे शहरातील नागरिक हा कमी खर्चात ई-व्हेइकलचा वापर करून आपल्या ठिकाणी पोचेल. शहराचे प्रदूषण कमी होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

Sakal 4-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : WORK OF APPRECIATION



अतिक्रमण कार्रवाई

# जब्त सामग्री पर CCTV की नजर

## गोदाम व वाहनों में लगाए जाएंगे कैमरे

संवाददाता

पुणे. महापालिका प्रशासन की ओर से शहर को अतिक्रमण मुक्त करने के लिए पथारियों पर कार्रवाई की जाती है. साथ ही जगह पर ही उनसे सामग्री व ठेले भी जब्त किए जाते हैं. इस जब्त सामग्री को ट्रक के माध्यम से गोडाऊन में रखा जाता है. उसके लिए मनपा ने 13 गोडाऊन बनाए हैं. तो आवागमन के लिए 16 ट्रक हैं. लेकिन यह जब्त सामग्री चोरी होने के मामले सामने आ रहे हैं. इस वजह से अब ऐसे ट्रक व गोडाऊन पर सीसीटीवी की नजर रहेगी. यहां पर सीसीटीवी लगाने का फैसला अतिक्रमण विभाग की ओर से लिया गया है. ऐसी जानकारी अतिक्रमण विभाग प्रमुख माधव जगताप ने दी.

**मनपा प्रशासन का फैसला**

### कार्रवाई में जब्त की जाती है सामग्री

ज्ञात हो कि शहर में करीब 2100 किमी की सड़कें हैं. इन सड़कों पर विगत कई सालों में बड़े पैमाने पर अतिक्रमण हो गया है. क्योंकि शहर जैसे बढ़ता गया, उसी तरह से आबादी बढ़ती गयी व अतिक्रमण का प्रमाण भी बढ़ता गया. पथारी व्यवसायिकों से लेकर सड़क के समीप बैठने वाले दुकानदारों ने सड़कों पर कब्जा किया है. इसमें सड़कों पर दीवार बनाना, दुकान की सामग्री सड़क पर लगाना, सड़कों पर सब्जी व शेष सामग्री के ठेले लगाना, भीड़ वाले सड़कों के पदपथों पर सामग्री बिक्री के लिए रखना, ऐसे विभिन्न कारणों की वजह से शहर का अतिक्रमण बढ़ता जा रहा है. इससे सड़के पूरी तरह से बदसूरत दिखती है. इन सड़कों पर खास तौर से फर्ग्युसन रोड़, बाजीराव रोड़, कुमठेकर रोड़, केलकर रोड़, लक्ष्मी रोड़, कर्वे रोड़, सिंहगढ़ रोड़, सातारा रोड़, नगर रोड़, विद्यापीठ रोड़, इन सड़कों का समावेश है.

- साथ ही उपनगरों के सड़को की हालत भी ऐसे ही है. ये अतिक्रमण हटाने का सब काम अतिक्रमण निरिक्षक व सहायक अतिक्रमण निरीक्षक को करना पड़ता है.
- कार्रवाई करने के बाद मनपा का अतिक्रमण विभाग पथारियों के ठेले व सामग्री भी जब्त करते हैं.
- बाद में दंड़ वसूलकर इन लोगों को सामग्री वापस दी जाती है. लेकिन अब सामने आ रहा है कि यह सामग्री चोरी हो रही है.

### मनपा के पास 13 गोडाऊन व 16 ट्रक

इस बारे में माधव जगताप ने कहा कि सामग्री चोरी होने का प्रमाण बढ़ गया है. कभी-कभार तो सामग्री गोडाऊन में आने से पहले ही चोरी हो रही है. यानी ट्रक से ही सामग्री चोरी हो रही है. इस पर पाबंदी लगाने के लिए हमने सीसीटीवी लगाने का फैसला लिया है. जगताप के अनुसार सामग्री रखने के लिए मनपा ने 13 गोडाऊन बनाए हैं. तो आवागमन के लिए 16 ट्रक हैं. लेकिन यह जब्त सामग्री चोरी होने के मामले सामने आ रहे है. इस वजह से अब ऐसे ट्रक व गोडाऊन पर सीसीटीवी की नजर रहेगी. बाद में जो नजर में आएगा, उस पर कार्रवाई की जाएगी.

अवैध पथारियों पर कार्रवाई कर उनसे सामग्री जब्त की जाती है. लेकिन उसकी चोरी हो रही है. इस वजह से प्रशासन से हमने मांग की है कि ऐसी चोरी पर पाबंदी लगाने के लिए गोडाऊन व वाहनों में सीसीटीवी लगा दिए जाएं. इससे संबंधित एक पत्र भी हमने अतिक्रमण विभाग को दिया है. इसके अनुसार प्रशासन द्वारा कार्रवाई शुरू कर दी गई है.

**- ज्योत्स्ना एकबोटे,** अध्यक्ष, महिला एवं बाल कल्याण समिति

Navbharat 5-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : WORK OF APPRECIATION

# CCTVs to scan vans taking action on illegal hawkers

### Move will track anti-encroachment drives and fix accountability on staff following misconduct plaints

Prachee.Kulkarni@timesgroup.com
TWEETS @prachee_mirror

In a bid to increase accountability of vehicles taking action against encroachers, Pune Municipal Corporation (PMC) has decided to install closed-circuit television (CCTV) cameras in such vans to monitor the whole process better. The decision followed a demand to strengthen vigil on drives against illegal hawkers put forth by a Bharatiya Janata Party (BJP) corporator.

Although the civic body has started a crackdown on illegal stalls in many parts of the city, hawkers without legitimate permits allegedly return to their original spots almost minutes after the anti-encroachment vehicles remove them and leave. Even deploying staff at fixed points to keep constant vigil has failed to yield desired results, said officials. Added to this, there have been complaints of misconduct by the encroachment department staff positioned with these vehicles.

To counter these issues, civic officials have now decided to bring these vehicles under the scanner. They have decided to install CCTV cameras in all such vehicles engaged in anti-encroachment drives. While PMC owns 15 such vehicles, contractors attached with the civic body possess an additional 15 vans to be put to use during such drives. All 30 of them will get the CCTV cameras, officials confirmed. This apart, the godowns where the seized materials are stored will also be kept under surveillance.

Speaking to *Mirror*, BJP corporator Jyotsna Ekbote, who had proposed the move, said, "Vehicles that lift two-wheelers from no-parking zones have CCTV cameras installed in them, which helps us track the dealings regarding the handling of the lifted vehicles and where they are kept. However, that is not the case with anti-encroachment vehicles. Although staffers take action against illegal hawkers, there is no process in place to track where the seized materials are taken. There have been instances where the seized items were returned midway, leading to confusion. Such problems are especially common in areas like Jangli Maharaj Road and Fergusson College Road. I had, therefore, demanded that CCTV cameras be installed in these vehicles to fix accountability on PMC workers." Taking immediate cognisance of the appeal, PMC authorities concerned have decided to implement the move. Contractors have been asked to install the cameras within a month.

Talking about the new ruling, Madhav Jagtap, head of encroachment department, said, "There have been multiple complaints about misconduct by the encroachment department staffers. Moreover, since the trend of the evicted hawkers returning to their original spots is way too common, we have decided to monitor and record the entire drive through CCTVs. The cameras will be connected to the PMC office, which will also help us keep a tab on the items seized."



FILE PHOTO



Paying heed to Ekbote's (above) appeal, PMC will place CCTVs in all 30 vehicles dedicated to eviction drives

Pune Mirror 5.3.2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : WORK OF APPRECIATION

# छोटी उम्र में ही डालें स्वच्छता की आदत

## नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे ने की छात्रों से अपील

संवाददाता

**पुणे.** प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी के मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लायन्स क्लब, मुक्ता चैरिटेबल फाउंडेशन के संयुक्त तरीके से नेताजी पालकर प्राथमिक विद्यालय में स्वास्थ्य शिविर का आयोजन किया गया था. इस अवसर पर नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे ने छात्रों से अपील की कि छोटी उम्र में ही स्वच्छता की आदत लगाएं, ताकि कोरोना जैसी बीमारियां नजदीक भी नहीं आएंगी.



### मनपा कराएगी सभी विद्यार्थियों की जांच

एकबोटे ने आगे कहा कि इस स्वास्थ्य शिविर में जो भी छात्र बीमारी से पीड़ित हैं, उन पर मनपा द्वारा उपचार किए जाएंगे. उन छात्रों को सभी स्वास्थ्य की सुविधा देने की जिम्मेदारी मनपा पर रहेगी. साथ ही इसी तर्ज पर मनपा स्कूलों के सभी छात्रों की स्वास्थ्य की जांच की जाएगी.

- कॉलेज के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव ने कहा कि छात्रों के स्वास्थ्य से संबंधित समस्याओं की जानकारी लेने के लिए इस तरह के शिविर आयोजन करना जरूरी है.
- इस कार्यक्रम के लिए मॉडर्न महाविद्यालय के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, इन्स्टीट्यूशनल रिस्पोंसिबिलीटी (ISR ) समिति की प्रमुख डॉ. शुभांगी पुराणिक, मराठी विभाग के प्राध्यापक डॉ. वैजयंतीमाला जाधव, वीर नेताजी पालकर विद्यालय स्थित सभी अध्यापक सेवक वर्ग व छात्र उपस्थित थे.

Navakaal 15.3.2020

# News Paper Clippings During March 2020

## SECTION : CONTRIBUTION OF INSTITUTIONS TOWARDS THE SOCIETY

Newsletter | आजचा ई-पेपर
शुक्रवार, मे 22, 2020
सकाळ | eSakal.com
ताज्या | मुख्य | पुणे | मुंबई | महाराष्ट्र | देश | ग्लोबल | SRF | SPORTS | कोरोना | LIVE TV | आणखी..
Home > Pune > Progressive Education Society Has Decided To Provide A Grant Of Rs 50 Lakh For The Chief Minister's Assistance Fund

### प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे ५० लाखाची मदत

सकाळ वृत्तसेवा | मंगळवार, 31 मार्च 2020

'कोरोना' विषाणू चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य व देश पातळीवर शर्थीचे प्रयत्न चालू आहे. यासाठी शासनाला मदत म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे ५० लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे - 'कोरोना' विषाणू चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य व देश पातळीवर शर्थीचे प्रयत्न चालू आहे. यासाठी शासनाला मदत म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे ५० लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बातम्या ऐकण्यासाठी डाऊनलोड करा ई-सकाळचे ॲप

'कोरोना'मुळे अकास्मिक उद्भवलेल्या आपत्तीला सामोरे जाताना विविध स्तरावर उपाय योजना व उपक्रम राबविले जात आहे. जनतेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक महत्त्वपुर्ण निर्णय शासन घेत आहे. एकीकडे देशात व राज्यात संपूर्णपणे लॉक डाऊन असताना मोठी आर्थिक हानी होत आहे. त्याचा बोजा महाराष्ट्र शासनावर येत आहे. त्यामुळे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे व संस्थेच्या पदाधिकारी यांनी सर्वानुमते संस्थेतील ४ हजारहून जास्त कार्यरत असलेल्या प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन व संस्थेच्या संबंधीचे व्यवसायिक याच्याकडून ठराविक रक्कम अशी एकूण ५० लाख रूपयांची "मुख्यमंत्री सहायता निधी" येथे जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात शाळा महाविद्यालय पूर्ववत सुरू झाल्यानंतर विद्यार्थी व पालकांना देखिल आर्थिक मदत देण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे.

"परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता शिक्षण, स्वयंसेवी व उद्योग क्षेत्रातील संस्थांनी या कठीण प्रसंगात महाराष्ट्र शासनास सर्वोतोपरी मदत करावी व खंबीरपणे शासनाच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन एकबोटे यांनी केले आहे.

# News Paper Clippings During March 2020

## Section : Contribution of Institutions towards the Society

### प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून ५० लाखांची मदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : करोना विषाणू संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकतेर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. एक दिवसाचे वेतन एकत्रित करून सुमारे ५० लाखांचा निधी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिला जाणार आहे.

करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. त्यानुसार प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. करोना संसर्ग रोखण्यासाठीच्या उपाययोजना करताना मोठ्या प्रमाणात आर्थिक भार शासनावर पडत आहे, ही बाब लक्षात घेऊन संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या एक दिवसाच्या वेतनाचे सुमारे ५० लाख रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी दिली.

# News Paper Clippings During March 2020

## SECTION:HEALTH

Counseling course valedictory function news in Punyanagari

# विद्यार्थ्यांना समजून घ्या : डॉ. ओक



। पुणे : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना समजून त्यांची मानसिकता सकारात्मक करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे. माहिती तंत्रज्ञानामुळे प्रचंड माहितीचा खजिना आपल्यासमोर आहे. मात्र, त्यातील गोष्टी कशा पद्धतीने शिकून घ्यायच्या, त्यासाठी काय मार्गदर्शन हवे, याविषयी मुलांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे, असे मत मानसशास्त्र विभागाच्या डॉ. अमृता ओक यांनी व्यक्त केले.

शिवाजीनगर येथील पी.ई. सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयामध्ये मानसशास्त्र विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. श्रद्धा साकतकर यांनी तज्ज्ञांच्या मदतीने अडीच महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये व्याख्यान, रोल प्ले, व्हिडीओ क्लीप याविषयीचे प्रात्यक्षिकही करून घेतले. शाळा-महाविद्यालयामधील या प्रशिक्षणाचा शिक्षकांनी लाभ घेतला. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षक-प्राध्यापकांना प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच भविष्यातही असे प्रशिक्षणवर्ग घेण्यात येतील, असे सांगितले.

डॉ. ओक म्हणाल्या की, मुलांचे हळवे मन असते, त्यांच्या मनावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही, त्यासाठी त्यांचे मन समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी पालकांनाही समजून सांगण्यासाठी शिक्षणकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

# News Paper Clippings During March 2020

## SECTION:HEALTH

## विद्यापीठांमध्ये लवकरच अमली पदार्थविरोधी कक्ष

पीटीआय, नवी दिल्ली



आरोग्य वार्ता

देशातील विद्यापीठांनी 'से नो टू ड्रग्ज' असे विद्यार्थी कक्ष स्थापन करावेत, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत. याद्वारे महाविद्यालयाच्या परिसरातील अमली पदार्थ पुरवठा व वापर रोखता येईल.

मोठ्या प्रमाणात युवक अमली पदार्थांचे सेवन करत असल्याच्या घटना अनेक विद्यापीठांमध्ये तसेच उच्च शिक्षण संस्थांमध्ये उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे हा प्रसार रोखणे हे मोठे आव्हान असल्याचे मत आयोगाने नोंदवले आहे. त्यामुळे संबंधित संस्थेतील प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली असा कक्ष सुरू करावा, असे आयोगाने सुचविले आहे. जर अशा घटना उघडकीस आल्या तर त्या या कक्षाने खबरदारी म्हणून पहिल्यांदा प्रबोधनाचे काम करावे, त्यात व्यसनाच्या आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांचे पुनर्वसन करण्यास मदत करणे, त्यांचे समुपदेशन तसेच अशा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करणे महत्त्वाचे असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव रजनीश जैन यांनी सर्व कुलगुरूंना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने अमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी एक राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतला आहे.

संबंधित विभागाशी समन्वय ठेवून एक कृती कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याची अंमलबजावणी १ एप्रिलपासून होईल असे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठात अशा ज्या संस्था स्थापन केल्या जाणार आहेत त्याला सामाजिक न्याय अर्थसाहाय्य देणार आहे. त्यातून अमली पदार्थ विरोधी मोहिमेत ते निर्णायक भूमिका बजावू शकतील. तसेच विद्यापीठे आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मदतीने जनजागृतीपर कार्यक्रम हाती घेऊ शकतील.

लोकसत्ता Mon, 09 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49795460

## ...तर संसर्गजन्य आजार टाळू शकतो



### प्रा. ज्योत्स्ना एकबोटे : मॉडर्न महाविद्यालयात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी

। पुणे : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी लहान वयात स्वच्छतेची सवय बाळगली, तर कोरोनासारख्या संसर्गजन्य आजारांशी आपण सहज लढा देऊ शकतो.

कोरोनाची लक्षणे आढळल्यास, तसेच आरोग्याच्या समस्या असतील, त्यांच्यावर महापालिकेच्या वतीने उपचार केले जातील. त्यांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा तातडीने मिळवून देण्यात येतील, असे प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी सांगितले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये लायन्स क्लब, मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना आजाराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी लायन्स क्लबच्या अॅड. प्रीती परांजपे, डॉ. शाहीन, डॉ. शुभांगी पुराणिक, प्रा. डॉ. वैजयंतीमाला जाधव, वीर नेताजी पालकर विद्यालयातील सर्व शिक्षक, सेवकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुनंदा मेमाणे यांचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले की, विद्यार्थ्यांचे बालपण आरोग्याच्या समस्यांनी कोमेजून जाऊ नये, यासाठी असे शिबिर घेणे गरजेचे आहे. सामाजिक भान जपणे ही काळाची गरज आहे.

चांगल्या सवयींचा विद्यार्थ्यांनी अवलंब केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनच्या डॉक्टर अर्चना चौगुले, डॉ. प्रकाश महाजन यांनी मुक्ता चॅरिटेबलच्या कामाच्या स्वरूपाविषयी माहिती दिली. डॉ. शुभांगी पुराणिक यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

Punyanagri 15-3-2020

# News Paper Clippings During March 2020

## Section : Research

# Rock pools that support unique ecosystems need conservation

Manjula.Nair
@timesgroup.com

**Pune:** A city-based group of scientists and researchers have taken up the study of temporary rock pool habitats that host a range of ecosystems in the tableland habitats of the Western Ghats.

Research group member Yugandhar Shinde, an assistant professor at the department of zoology, Modern College of Arts, Science and Commerce, said almost 97% water in the world is saline.

"The remaining 2% is under glaciers in the Arctic or the Antarctic. The 1% available as fresh water is from the rivers, ponds, pools and lakes. Of this 1%, about 0.35% water is in temporary habitats or pools which harbours 35% of freshwater diversity," he said.

**WORLD OF DISCOVERY**



The pools harbour diverse groups of invertebrates

Such temporary habitats are not just available in the tropical regions with a lot of rain. "In some cases, it is there in colder climate. Melting snow forms small pools, particularly in grassland areas. In India, we generally look at rainwater pools. Not only animals, but plants are found only in these ephemeral aquatic habitats," he added.

The flora on the Kas plateau is a kind of ephemeral habitat.

"We find some freshwater habitats, and we get some plants which are not terrestrial, but aquatic. Similarly, there are many animal communities in such habitats with very low nutrients," he said.

Panchgani is another example of such habitats. "The substrata is mostly rock. The little amount of field or mud has poor nutrients. Fauna has adapted to oligotrophic habitats where nutrients are very low. These habitats harbour unique fauna and that ecosystem or ephemeral water body has a whole community, not just one or two animals. If the habitat is destroyed, you will lose a whole community and not just a single species," he said.

Independent researcher Mihir Kulkarni said the pools are temporary and can hold water for a week to eight days. "In our ecosystems, we have pools that can hold water from 15 days to four or five months. This makes the habitat unique, when you compare it to other such systems in the world. Although, they are temporary, the duration of them being filled with water is quite different," he said.

These pools harbour diverse groups of invertebrates.

"They will belong to four or five different groups. Commonly, you could find insect groups, crustaceans and other interesting groups like tardigrades which were released on the moon. All these animals have one thing in common specifically with crustaceans and tardigrades— they are desiccation resistant species. They can resist dry conditions for a considerable amount of time. This adaptation enables them to survive in the pools because they can't fly away to other habitats like other insects," he said.

Conserving the habitat would help conserve a particular species because most of them are very small. "If you look at all these different organisms, plants and invertebrates and so on, they are not found in other habitats even on comparable altitudes. It is important to conserve the habitat," Kulkarni added.

Common threats include mining. " In the Konkan region, tourism brings rubbish which can destroy the ecosystem. We don't have a much information about the species which can reveal what we are losing out. Other concerns are climate change because if the rainfall pattern changes, and the animals don't adapt well and will have to make adjustments to their life cycle. It can wipe out an entire ecosystem. So, habitats and landscapes must be conserved."

**Times of India 9-3-2020**

# News Paper Clippings During March 2020

## Section : Research

# Fairy shrimps find a home in temporary rock pools on plateaus of Western Ghats

Manjula.Nair@timesgroup.com

**Pune:** A new species of fairy shrimp crustacean called *Streptocephalus sahyadriensis* has been found recently in the temporary rock pools formed on the tableland, or Asia Plateau in Panchgani in the Western Ghats.

Also known as the Sahyadri Fairy Shrimp, the crustacean species was collected by two researchers —Yugandhar Shinde, an assistant professor at the department of zoology, Modern College of Arts, Science and Commerce and Sameer Padhye — who have been studying such habitats in and around Pune.

**WORLD OF DISCOVERY**

These researchers from colleges and institutes across Pune have been studying temporary water habitats and the species they host since 2008. The species has so far only been recorded on few rocky outcrops of Satara.

Scientist Sameer Padhye, who works on freshwater crustaceans, described the species. He said what was interesting about the shrimp was its unique survival strategy.

"The shrimp survives in rocky pools formed in the monsoon on some of the rocky outcrops of the Western Ghats'. These pools get filled with water during the monsoon, and are dry for the most of the year. The eggs that these shrimp lay, can survive for the dry phase. Once the rocky pool is filled up again during the next monsoon, the eggs hatch allowing the species to once again populate the pool," Padhye, who works with Zoo Outreach Organisation, said.

He has published his findings in the peer-reviewed journal Zootaxa. He added that the fairy shrimp is unique in terms of its morphological characteristics. Not only can the shrimp survive in fluctuating temperature conditions, but is also an endemic species. "So far, this species has only been recorded in pools on a few lateritic rocky outcrops in Satara."

Padhye said rocky outcrops need to be studied further as rock pools host a variety of new and undescribed species.

"These habitats are formed only during the monsoon, and last for around a month after the monsoon. They're home to very unique life forms and many are found only in such habitats. These animals are specifically adapted to survive in such ecosystems and their populations are restricted to these habitats. For instance, if you see them on rock pools on Tableland plateau, then there is a possibility that could be restricted to such habitats," he said.

One of the biggest challenges in conservation of this species is habitat protection. "If the pool is completely destroyed, you lose that population and possibly the species itself. People are unaware of these species, which makes it tough to conserve them. Our aim is to tell them to study these habitats as they have tremendous biodiversity," Padhye said.

Pic courtesy: Sameer Padhye & Yugandhar Shinde



The new species of fairy shrimp crustacean 'Streptocephalus sahyadriensis'

**Times of India**

# News Paper Clippings During March 2020

## Section : Sports

सकाळ

# मॉडर्नमध्ये खेळाडूंचा सत्कार

वारजे, ता. २ : कोणत्याही खेळाची सुरुवात बालवयात करणे आवश्यक असते. आपण करतो ती प्रत्येक हालचाल ही क्रीडा असते; पण त्यामध्ये फक्त लयबद्धता व तालबद्धता असावी लागते. प्रत्येक गोष्ट सरकारने करावी, अशी आपली धारणा असते. त्यामुळे क्रीडाक्षेत्र आजही दुर्लक्षित आहे, अशी खंत अर्जुन पुरस्कार विजेते श्रीरंग इनामदार यांनी व्यक्त केली.

वारज्यातील मॉडर्न विद्यालयात प्रशालेतील खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या वेळी इनामदार बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश ठिपसे यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाचा ताण हलका करायचा असेल तर कोणत्याही आवडीच्या एका क्रीडा प्रकारात सहभागी होण्याचे आवाहन केले. क्रीडा समारंभाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गोकूळ कांबळे यांनी केले. याप्रसंगी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संजीवनी फुलारी उपस्थित होत्या. पाहुण्यांचा परिचय मनीषा कांबळे यांनी केला. कार्यक्रमाचे आयोजन क्रीडाशिक्षक योगेश टेकाळे यांनी केले. सूत्रसंचालन वैदेही शेटे यांनी केले. आभार दीपक कदम यांनी मानले.

Pune, Pune-Today
03/03/2020 Page No. 5

# News Paper Clippings During March 2020

## SECTION: MISCELLANEOUS

विशाखा कुलकर्णी



# बदलती वाचनसंस्कृती

**मोबाइल आले, तसे प्रवासातील पुस्तकांची आणि निवांत वेळेतल्या वाचनाची जागा मोबाइलने घेतली आणि वाचकांची संख्या बरीच कमी झाली हे जरी खरं असलं तरी, "तरुण पिढी वाचतच नाही" हे विधान मात्र सत्य नाही. याउलट वाचनसंस्कृतीचा प्रसार करणारे, वाचनाची आवड जोपासणारे आणि वाढवणारे अनेकजण एकत्र येऊन काहीतरी वेगवेगळे प्रयोग करत असतात!**

**वाचन हा** हल्लीच्या 'नर्ड कल्चर'चा महत्त्वाचा भाग झाला आहे. पुस्तकाच्या विश्वात हरवून जाऊन तासन्‌तास वाचन करणाऱ्यांची संख्या खूप आहे. पूर्वी म्हणजे मोबाइल आगमनपूर्व काळात लोकल प्रवासात वर्तमानपत्रे, मासिके मोठ्या प्रमाणावर वाचली जायची. महिलांची काही ठरलेली मासिके आवर्जून वाचताना स्त्रिया दिसायच्या. दीड-दोन तासांच्या प्रवासात दुसरं करणार तरी काय म्हणा! पण हे वाचन करणे, वाचक आणि पुस्तकापुरतेच मर्यादित असे, फारतर त्या पुस्तकाची माहिती वैयक्तिक डायरीत नोंद होई. पण असे उदाहरणदेखील क्वचितच! मोबाइल आले, तसे प्रवासातील पुस्तकांची आणि निवांत वेळेतल्या वाचनाची जागा मोबाइलने घेतली आणि वाचकांची संख्या बरीच कमी झाली हे जरी खरं असलं तरी, ''तरुण पिढी वाचतच नाही'' हे विधान मात्र सत्य नाही.

याउलट वाचनसंस्कृतीचा प्रसार करणारे, वाचनाची आवड जोपासणारे आणि वाढवणारे अनेकजण एकत्र येऊन काहीतरी वेगवेगळे प्रयोग करत असतात! आणि यांच्याच अशा प्रयत्नाने वाचन हे केवळ एखाद्या व्यक्तीपुरते मर्यादित न राहता त्याचे स्वरूप व्यापक होत जाते आहे.

याचे सर्वात जवळचे उदाहरण म्हणजे ज्या ''स्मार्टफोनमध्ये डोकं खुपसून'' सगळेजण बसलेले दिसतात, तो स्मार्टफोनच आहे. सोशल मीडियावर केवळ वाचनासाठी असणारे अनेक ग्रुप्स आहेत, ज्यावर केवळ वाचन, पुस्तकं, साहित्याविषयी चर्चा होते. वाचनवेडा, मराठी पुस्तकप्रेमी, पुस्तकबिस्तक अशा काही ग्रुप्सची सदस्यसंख्या खूप आहे. वाचनाची आवड असलेले लोक या ग्रुपवर आपल्याला आवडलेल्या पुस्तकांची माहिती टाकत असतात, यामुळे मोठ्या प्रमाणावर माहितीचे संकलन आणि देवाणघेवाण होते आहे. या ग्रुपवर चालणाऱ्या चर्चांकडे एक नजर टाकली असता हे लक्षात येते की या चर्चेमुळे केवळ पुस्तकाची माहितीच कळते असे नाही तर एखाद्या पुस्तकाविषयीचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण, त्यातल्या विषयाबद्दल असलेला वाचकाचा दृष्टिकोन यांसारख्या गोष्टींवर चर्चा होते, एखाद्या वाचकाला या चर्चेतून ते नव्याने समजते. या पुस्तकांच्या ग्रुपवर दुर्मीळ पुस्तकांचीदेखील माहिती मिळणे सोपे झाले आहे. पूर्वी पुस्तकांची, पुस्तक प्रदर्शनाची माहिती केवळ वर्तमानपत्रातून वाचायला मिळत होती, मात्र सोशल मीडिया साइटमुळे ही माहितीदेखील योग्य त्या वाचकांपर्यंत पोहोचणे सहज शक्य झाले आहे. याविषयी सांगताना वाचनप्रेमी विजय बेंद्रे आपल्या एका अनुभवाविषयी सांगतात, सोशल मीडियावर होणाऱ्या या चर्चेमुळे वाचकांच्या पुस्तकांच्या खरेदीचा कलदेखील बदलताना दिसतो. लहान लहान गावांपर्यंत, जिथे वर्तमानपत्रदेखील लवकर पोहोचत नाही अशा ठिकाणी सोशल मीडियातील ग्रुप्सवरून माहिती घेऊन नुकत्याच पार पडलेल्या साहित्य संमेलनात लहान गावातील लोक पुस्तकांची खरेदी करत होते. सोशल मीडियाचा वाचनसंस्कृतीवर होणारा हा प्रभाव निश्चितच लक्षणीय आहे.

सोशल मीडियावर असलेले हे ग्रुप्स केवळ सोशल मीडियापुरतेच मर्यादित राहत नाहीत, तर पुढेही या ग्रुपचे सदस्य एकत्र येऊन खूप छान 'मैफल' जमवतात, याचेच उदाहरण पुण्यातील अनिल आठलेकर यांनी सुरू केलेली वाचकमैफल, यामध्ये नियमितपणे वाचनाची आवड असलेले सदस्य एकत्र येऊन आवडलेल्या पुस्तकाची माहिती देतात, त्याचे अभिवाचन केले जाते, या उपक्रमात नामांकित लेखकदेखील वाचकांची भेट घेतात. वाचनाच्या ग्रुप्सद्वारे केला जाणारा आणखी एक उपक्रम म्हणजे पुस्तकांची देवाणघेवाण, यात आपल्याला आवडलेली, दुसऱ्याने आवर्जून वाचावीत अशी वाटणारी पुस्तकं प्रत्येकाने आणून ती इतरांना द्यायची, आणि आपणही इतरांनी सुचवलेले पुस्तक त्यांच्याकडून वाचायला घ्यायचे!

हल्ली वाचनाच्या पद्धतीच्या बाबतीतसुद्धा दोन गट पडले आहेत, स्क्रीनवर पुस्तके वाचू शकणारे आणि फक्त कागदावरच, प्रत्यक्षपणे पुस्तक वाचले तरच पुस्तक वाचल्याचा 'फील' येतो असे म्हणणारे! याचा सुवर्णमध्य काढला आहे तो 'किंडल'ने. डिजिटल असूनही डोळ्यांवर ताण न येता कागदावरच पुस्तके वाचल्याचा अनुभव देणारे 'ॲमेझॉन'चे किंडल मराठी वाचकांमध्ये, विशेषतः तरुणाईमध्ये लोकप्रिय आहे.

स्क्रीनवर पुस्तक वाचणाऱ्या वाचकांमध्येही रीतसर ई बुक विकत घेऊन वाचणारे आहेतच, पण पीडीएफ स्वरूपातील पुस्तके मोफत वाचणारे वाचकदेखील आहेतच. कॉपीराइट हक्क संपलेली पुस्तके पीडीएफ स्वरूपात इंटरनेटवर मिळतात आणि अनेकजण ते डाउनलोड करून वाचनाचा आनंद घेतात, मात्र यात अवैधरीत्यासुद्धा पुस्तके व्हायरल होताना दिसतात. सोशल मीडियावर अशा पद्धतीने होणाऱ्या पीडीएफच्या देवाणघेवाणीवर विविध ग्रुप्सच्या माध्यमातून कडक निर्बंध लावले गेले आहेत, त्याचप्रमाणे वाचकांचादेखील अशा प्रकारे बेकायदेशीर पुस्तके वाचण्याला विरोध होताना दिसतो. तंत्रस्नेही काळात बदलणाऱ्या वाचनसंस्कृतीसोबत अशा प्रकारे कायदेशीर मार्गाचे होणारे अवलंबन निश्चितच महत्त्वाचे आणि सकारात्मक आहे.

वाचनाच्या तंत्रस्नेही असण्याबद्दल बोलतानाच केवळ पुस्तके सोडून इतरही अनेक माध्यमांद्वारे वाचनाची आवड जोपासली जाते. प्ले स्टोअरवर एकच

**हल्ली वाचनाच्या पद्धतीच्या बाबतीतसुद्धा दोन गट पडले आहेत, स्क्रीनवर पुस्तके वाचू शकणारे आणि फक्त कागदावरच, प्रत्यक्षपणे पुस्तक वाचले तरच पुस्तक वाचल्याचा 'फील' येतो असे म्हणणारे! याचा सुवर्णमध्य काढला आहे तो 'किंडल'ने. डिजिटल असूनही डोळ्यांवर ताण न येता कागदावरच पुस्तके वाचल्याचा अनुभव देणारे 'ॲमेझॉन'चे किंडल मराठी वाचकांमध्ये, विशेषतः तरुणाईमध्ये लोकप्रिय आहे.**



दीर्घकथा, अनेक ब्लॉग्सचे संकलन अशा प्रकारचे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. फेसबुकवर लिखाण करणारे जसे अनेकजण आहेत, तसेच फक्त फेसबुकवरच्या पोस्ट्स आवडीने वाचणारे वाचकदेखील आहेतच! फेसबुकवरील लिखाणात विषयाचे कोणतेही बंधन नसल्याने अनेक वैविध्यपूर्ण विषयांवर लिहिणाऱ्या लेखकांचा स्वतःचा असा वाचकवर्ग झाला आहे. वाचनासाठी प्रत्येक वेळी पुस्तके खरेदी करू न शकणाऱ्या, अगदी लहान लहान गावातील वाचकांपर्यंतदेखील हे फेसबुकवरचे लिखाण पोहोचलेले दिसते, अर्थात फेसबुकवर आहे म्हणून या लिखाणाचा दर्जा कुठेही कमी *(पान २ वर)*

लोकसत्ता Fri, 13 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49911350

# News Paper Clippings During March 2020

## SECTION:MISCELLANEOUS

# बदलती वाचनसंस्कृती

*(पान १ वरून)* झालेला दिसत नाही. 'ब्लॉग'च्या माध्यमापेक्षा फेसबुकवर केलेले लिखाण अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचते.

फेसबुकसारख्या साइटवर केलेल्या लिखाणात लेखकांना प्रत्यक्ष आर्थिक फायदा नसला तरी पेजेसच्या माध्यमातून तो मिळू शकतो. याव्यतिरिक्त 'लेखक ऑनलाइन' यासारख्या वेबसाइटच्या माध्यमातून नाममात्र सबस्क्रिप्शन भरून विविध लेखकांचे लिखाणदेखील वाचता येते.



अल्पावधीत मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झालेल्या वाचनासाठीच्या माध्यमांमध्ये समावेश होतो तो 'प्रतिलिपी' आणि 'स्टोरीमिरर' यासारख्या वेबसाइट्सचा. या वेबसाइटवर लेखन करणारे अनेक लेखक आपले लिखाण कथा, दीर्घकथा, कविता अशा वेगवेगळ्या माध्यमातून टाकू शकतात, आणि या कथा वाचकांसाठी मोफत उपलब्ध आहेत. आजच्या घडीला आखो वाचक अगदी रोज या ॲप्सवर वाचन करत असतात. या ॲप्सवर भरवल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये वाचकदेखील भाग घेऊ शकतात. पुस्तकांच्या माध्यमातून होणारे वाचन हे केवळ वाचकाच्या स्वतंत्र दृष्टिकोनातून होते, लेखकाचे पुस्तक लिहून झाल्यानंतर त्याची आणि वाचकाची भेट फक्त पुस्तकाच्या माध्यमातून होते, तर अशा प्रकारच्या ॲप्समध्ये वाचक प्रत्यक्ष लेखकाशी संवाद साधू शकतात.

बदलत्या वाचनामध्ये प्रत्यक्ष वाचन होत नसले तरी ऑडिओ बुक्सचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे. यू ट्यूबवर तसेच ऑडिओ बुक्सच्या ॲपवर अनेक मराठी पुस्तकांचे ऑडिओ बुक्स उपलब्ध आहेत. स्टोरीटेल, स्नोव्हेल, बोलती पुस्तके यांसारखे अनेक ॲप्स दर्जेदार ऑडिओ बुक्स उपलब्ध करून देतात.

अगदी काही वर्षांपूर्वी केवळ पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे एवढ्या मर्यादित साधनांच्या माध्यमातून होणाऱ्या मराठी वाचनाने आपल्या कक्षा विस्तारल्या आहेत. यापुढेही वाचनाची आवड कोणत्या नव्या नव्या माध्यमातून जोपासली जातेय हे पाहणे उत्सुकतेचे आहेच. तंत्रज्ञान जसजसे 'अपडेट' होते आहे तसेच वाचनाच्या सवयीसुद्धा बदलत आहेत, वाचनाचे वेड मात्र तसेच आहे!

viva@expressindia.com

लोकसत्ता Fri, 13 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49911190

# Upcoming Events

## April 2020

| SUN | M | TUE | WE | THU | FR | SAT |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 Mahatma Jyotiba Phule Jayanti  |
| 12 | 13 | 14 Dr. Babasaheb Ambedkar Jayanti  | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 Mahatma Basveshwar Maharaj Jayanti (Tithinusar)  | 27 | 28 | 29 | 30 Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti  | | |




*Other than the College Photos, Event Photos, newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*